## वृषाली जोशी

# व्याघ्रकथा ३



# व्याघ्रकथा ३

## लेखक- जिम कॉर्बेट

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# व्याघ्रकथा ३


लेखक - जिम कॉर्बेट

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १३ एप्रिल २०२६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे बासष्ट पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२११७४६२४५

# तिसऱ्या भागातील कथा क्रम

**लेखकाचे मनोगत**

**रॉबिन**

**पिंपळपाणी वाघ**

**ठाक मनुष्यभक्षक**

**वाघाचे फोटो काढणारा कॉर्बेट**

## या पूर्वीचे दोन भाग

## दुसऱ्या भागातील कथा क्रम

चौगडचे वाघ
पोवलगडचा पूर्ण वाढ झालेला वाघाचा बच्चा
मोहन मनुष्यभक्षक
माझ्या स्वप्नातील मासा
कांडा मनुष्यभक्षक

पहिल्या भागातील कथा- चंपावतचा मनुष्यभक्षक

# जिम कॉर्बेट



एडवर्ड जिम कॉर्बेट हा अँग्लो इंडियन शिकारी व लेखक होता. त्याने उत्तर भारतातील असंख्य वाघ व बिबटे यांची शिकार केली. हे त्यानेत्याच्या ‘रुद्रप्रयाग चा नरभक्षक वाघ’ या प्रसिद्ध पुस्तकातून लिहिले आहे. तो नैनिताल येथे २५ जुलै १८७५ मध्ये जन्मला व १९ एप्रिल १९५५ मध्ये मरण पावला मेरी व ख्रिस्तोफर कॉर्बेट हे त्याचे आईवडील होते ते केनियामधील रहिवासी होते.. त्यांच्या कुत्र्याचे नाव रॉबिन होते, जो सतत त्यांच्याबरोबर असे. उत्तर भारतातील उत्तराखंड राज्यातील जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान हे वाघ, बिबटे, रानटी हत्ती, इतर शेकडो जंगली प्राणीपक्षी व जीवजंतू असलेले भारतातील पहीले राष्ट्रीय उद्यान आहे.

यातील सर्वात मोठा हर्क्युलिस नावाचा वाघ, तीनशे किलो वजनाचा व सात फूट लांबीचा आहे..

# लेखकाचे मनोगत



या पुस्तकातील अनेक कथा नरभक्षक वाघांबद्दल असल्यामुळे, हे प्राणी नरभक्षक का बनतात, हे स्पष्ट करणे उचित ठरेल.

नरभक्षक वाघ हा असा वाघ असतो की जो स्वतःच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या परिस्थितीच्या ताणामुळे त्याच्या नैसर्गिक आहाराबाहेरील आहार घ्यायला भाग पाडला गेलेला असतो. अशा परिस्थितीचा ताण दहा पैकी नऊ वेळा जखमांमुळे, आणि दहाव्या वेळेस म्हातारपणामुळे उद्भवतो. एखादा विशिष्ट वाघ नरभक्षक का बनतो, यामागे कारण असते – एखाद्या निष्काळजीपणे झाडलेल्या गोळीने झालेली जखम आणि जखमी वाघाचा पाठपुरावा करून त्याला ठार न मारणे, किंवा एखाद्या वाघानेसाळींदराला मारताना संतापून करून घेतलेली दुखापत.

माणसं ही वाघांची नैसर्गिक शिकार नसते, आणि फक्त जेव्हा वाघ जखमांमुळे किंवा वयामुळे अपंग होतात, तेव्हाच त्यांना जगण्यासाठी माणसांचे मांस खाण्यास भाग पाडले जाते.

वाघ जेव्हा आपली नैसर्गिक शिकार मारतो – जी तो दबा धरून किंवा हळूच पाठलाग करून करतो – तेव्हा त्याच्या हल्ल्याच्या यशस्वितेसाठी वेग, आणि काही

प्रमाणात त्याचे दात व नखं यांची चांगली अवस्था, यावर अवलंबून असतो. म्हणूनच, जेव्हा वाघाला एक किंवा अधिक वेदनादायक जखमा झालेल्या असतात, किंवा त्याचे दात पडलेले किंवाखराब झालेले असतात, आणि नखं झिजलेली असतात, आणि त्याला पूर्वी खाल्ली जाणारी प्राणीशिकार करता येत नाही, तेव्हा त्याला नाईलाजाने माणसांना मारावे लागते.

प्राण्यांपासून माणसाच्या मांसाकडे झालेला हा बदल, माझ्या मते, बहुतेक वेळा अनवधानाने होतो. ‘अनवधानाने’ म्हणजे काय, हे समजावण्यासाठी मी मुक्तेश्वरच्या नरभक्षक वाघीणीचा दाखला देतो.

ही वाघीण तुलनेने तरुण होती, आणि एका साळींदराबरोबर झालेल्या झटापटीत तिच्या एका डोळ्याला इजा झाली आणि सुमारे पन्नास काटे – ज्यांची लांबी एक ते नऊ इंच होती – तिच्या उजव्या पुढच्या पायाच्या पंजाखाली आणि हातात घुसले. या काट्यांपैकी काहींनी हाडाला धडकून याच्या दोन्ही टोकांचा यू (U) आकार घेतला होता, म्हणजे टोक व तुटलेलाभाग अगदी जवळ आले होते. जेव्हा तिने हे काटे दातांनी काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तिथे पू साचलेले फोड झाले. आणि ही वाघीण जखमी अवस्थेत पडून होती, तेव्हा तिथे गवताचा एक दाट तुकडा होता. उपाशी वाघीण तिथे तिच्या जखमा चाटत पडली होती. त्याच वेळी, एक बाईने आपल्या जनावरांसाठी चारा कापण्यासाठी नेमका हाच गवताचा तुकडा निवडला. सुरुवातीला त्या वाघीणीकडं तिचं लक्ष गेलं नाही. पण जेंव्हा ती बाई गवत कापत कापत अगदी जिथे वाघीण पडली होती तिथवर आली, तेंव्हा वाघिणीनं एकच घाव घातला, आणि त्या घावानं बाईचं कपाळ चिरडलं. तिचा मृत्यू क्षणातच झाला. दुसऱ्या दिवशी जेव्हा तिचा मृतदेह सापडला, तेव्हा तिच्या एका हातात

दरवणी (कोयता) होता आणि दुसऱ्या हातात गवताचा एक तुरा होता – जो ती कापणार होती, तेव्हाच तिला घाव बसला होता.

ती वाघीण बाईला तिथेच सोडून एक मैलभर अंतरावर एका पडलेल्या झाडाखाली असलेल्या खळग्यात लंगडत गेली आणि तिथं लपली. दोन दिवसांनी, एक पुरुष त्या झाडाचे लाकूड तोडण्यासाठी आला. वाघीण त्या झाडाच्या दुसऱ्या बाजूला पडली होती – आणि त्यानं तिला व्यत्यय दिला – म्हणून वाघिणीनं त्याला ठार केलं. तो माणूस झाडावर आडवा पडला. त्यानं आपला कोट व अंगातलासदरा उतरवला होता. वाघिणीनं त्याच्या पाठीत पंजा मारलेला होता. त्यामुळे त्याच्या शरीरातून वाहणाऱ्या रक्ताचा वास झाडाच्या बुंध्यावर झुलत असताना वाघिणीच्या नाकात गेला असावा – आणि त्यामुळे तिला पहिल्यांदा वाटलं असावं की हे काहीतरी खाण्याजोगं आहे.

...आणि जे लोक सुरक्षितपणे आपल्या घरी परततात, त्यांना हे देखील माहीत नसतं की ते या तथाकथित 'निर्दयी' आणि 'रक्तपिपासू' प्राण्याच्यादेखरेखीखाली होते.

बोराच्या झुडपातून वाघ बाहेर पडला, त्या दिवसाला आता अर्धशतक लोटलं आहे. या कालखंडातील शेवटची बत्तीस वर्षं मी नरभक्षक वाघांच्याशोधात आणि पाठलागात घालवली आहेत. या काळात अशा दृष्यांचाअनुभव आला, की ज्यांना पाहून दगडालाही अश्रू आले असते. तरीही मी एकही असा प्रसंग पाहिलेला नाही, की जिथे एखादा वाघ मुद्दाम निर्दयीपणे वागला, किंवा कोणत्याही उकसणीशिवाय, भूक भागवण्यापेक्षा जास्त जीव घेतले.

निसर्गाच्या योजनेत वाघाचं काम म्हणजे नैसर्गिक समतोल राखणं. आणिजर कधी कधी टोकाच्या गरजेमुळे त्यानं एखाद्या माणसाला मारलं, किंवा माणसांनी त्याच्या नैसर्गिक अन्नस्रोताचा संपूर्ण नाश केल्यामुळे त्यानं गायीगुरं मारली – आणि

त्यातूनही त्यानं एकूण त्याच्यावर लादलेल्या संख्येपैकी केवळ दोन टक्के गुरं मारली – तरीकेवळ या कृतींवरून संपूर्ण जातीला 'निर्दयी' आणि 'रक्तपिपासू' असंम्हणणं अन्यायकारक आहे.

शिकारी लोक बहुतेक वेळा पारंपरिक विचारांचे असतात. कारण, त्यांची मतं तयार व्हायला त्यांना अनेक वर्षं लागतात. आणि प्रत्येक माणसाचा दृष्टिकोन वेगळा असतो, म्हणून छोट्या-मोठ्या मुद्द्यांवर मतभेद होणं स्वाभाविक आहे. त्यामुळे मी हे गृहित धरत नाही की मी व्यक्त केलेलीसर्व मतं सार्वत्रिकपणे मान्य होतील.

मात्र एक गोष्ट अशी आहे जिथे मला खात्री आहे की सर्व शिकारी – मग त्यांचा दृष्टिकोन झाडावरच्या मचाणावरून असो, हत्तीच्या पाठीवरून असो, किंवा जमिनीवर चालत असो – माझ्याशी सहमत होतील, आणि ती म्हणजे, वाघ हा मोठ्या मनाचा, अपार धैर्याचा सभ्य प्राणी आहे. आणि जर त्याचा पूर्णपणे नाश झाला – जो होणारच आहे आणिजर लोकमत त्याच्या संरक्षणासाठी उभं राहीलं नाही – तर भारताची खूप मोठी हानी होईल, कारण आपला सर्वांत तेजस्वी वन्य प्राणी आपण गमावलेला असेल.

वाघांपेक्षा बिबट्या काही प्रमाणात सडलेल्या अन्नावर जगतो, आणि जेव्हा माणूस अतिरीक्त प्रमाणात शिकार करून त्याच्या नैसर्गिक अन्नाचा अभाव निर्माण करतो, तेव्हा तो माणसाचं मांस खाऊ लागतो आणि नरभक्षक बनतो.

आपल्या डोंगरमाथ्यांवरील रहिवासी बहुसंख्येने हिंदू आहेत, आणि त्यामुळेते मृतदेहांचे दहन करतात. हे दहन नेहमी नदी किंवा ओढ्याच्या काठावर केलं जातं, जेणेकरून राख गंगेपर्यंत आणि पुढे समुद्रात जाईल. बहुतेक गावे डोंगरावर उंच असतात, आणि नद्या किंवा ओढे अनेकदा खोल दऱ्यांमध्ये, मैलभर दूर असतात.

त्यामुळे अंत्यसंस्कार ही एक मोठी शारीरिक कामगिरी ठरते – कारण मृतदेह वाहून न्यायचा असतो आणि दहनासाठी लाकूडसुद्धा गोळा करावं लागतं.

सामान्य काळात हे विधी योग्य प्रकारे पार पाडले जातात. पण जेव्हाएखादा साथीचा रोग डोंगरमाथ्यावर पसरतो आणि माणसं इतक्या वेगाने मरतात की त्यांचं योग्य दहन करणं शक्य होत नाही, तेव्हा एक सोपाविधी केला जातो – म्हणजे मृताच्या तोंडात जिवंत कोळसा ठेवला जातो

आणि नंतर त्याचा देह डोंगराच्या कड्यावरून दरीत फेकून दिला जातो.

ज्या भागात बिबट्याचं नैसर्गिक अन्न कमी असतं, तिथं असे मृतदेह मिळाल्यावर तो लवकरच माणसाच्या मांसाची चव घेतो. आणि नंतर, जेव्हा रोग ओसरतो आणि सामान्य स्थिती परत येते, तेव्हा त्याला अन्नाचा स्रोत बंद झाल्यामुळे तो पुन्हा माणसांना मारायला सुरुवात करतो.

कुमाऊँमधील दोन नरभक्षक बिबट्यांनी मिळून ५२५ माणसं मारली होती. त्यापैकी एकानं फार तीव्र कॉलऱ्याच्या साथीच्या पाठोपाठ हल्ले केले, तर दुसऱ्यानं १९१८ साली भारतात पसरलेल्या आणि 'वॉर फीव्हर' म्हणून ओळखल्या गेलेल्या एका रहस्यमय रोगानंतर नरभक्षक प्रवृत्ती अंगीकारली.

हे खरं की नाही माहीत नाही, पण त्याला तिथून सोडण्यापूर्वी त्या वाघिणीनं त्यामाणसाच्या पाठीतून थोडं मांस खाल्लं. त्यानंतरच्या दिवशी तिनं आपला तिसरा बळी पूर्णपणे हेतुपुरस्सर घेतला – कोणीही उकसवणी न देता.

त्यानंतर ती वाघीण एक स्थायिक नरभक्षक झाली आणि शेवटी ती ठार मारली जाईपर्यंत तिनं २४ लोकांना मारलं.

एका वाघानं नुकताच एखादा प्राणी मारलेला असो, किंवा वाघ जखमी असो, किंवा तिच्या पिल्लांसह असलेली वाघीण असो – अशा वेळी जर माणसांनी त्याला व्यत्यय दिला, तर ते कधी कधी माणसांना ठार मारू शकतात; पण अशा वाघांना नरभक्षक म्हणता येत नाही – जरी लोक तसं म्हणत असले तरी, वैयक्तिक मताने, मी एखाद्या वाघाला नरभक्षक म्हणून घोषित करण्याआधी त्याला एकदा नाही, तर दोनदा तरी संशयाचा फायदा देईन. आणि शक्य असेल, तर जो बळी गेलेला आहे, त्याचं शवविच्छेदन करूनच ही शिकार वाघाने (किंवा बिबट्याने) केल्याचा निर्णय घेईन.

माणसांच्या मृत्यूमागे खरंच मांसाहारी प्राणी कारणीभूत आहेत का, हे शोधण्यासाठी शवविच्छेदन खूप महत्त्वाचं असतं. कारण – जरी मीविशिष्ट उदाहरणं देत नाही – तरी मी अशी प्रकरणं ओळखतो, जिथेमाणसांचा मृत्यू चुकीने मांसाहारी प्राण्यांवर लादण्यात आला आहे.

लोकांमध्ये एक सामान्य गैरसमज आहे की सर्व नरभक्षक वाघ म्हातारे आणि खरुजलेले असतात, आणि त्यांना आलेला खरूज हा रोग माणसाच्या मांसातील क्षारामुळे होतो. माणसाच्या मांसात प्राण्यांच्या मांसाच्या तुलनेत किती क्षार असतो, हे मी सांगू शकणार नाही. पण मी खात्रीने सांगतो की माणसाचं मांस खाल्ल्यानं नरभक्षक वाघांच्या अंगावरचे केस खराब होतात, ही कल्पनाच चुकीची आहे. उलट, मी पाहिलेल्या सर्व नरभक्षक वाघांच्या अंगावरची लोमश चामडी फारच सुंदर आणि उठून दिसणारी होती.

नरभक्षक वाघांच्या संदर्भात अजून एक समजूत म्हणजे त्यांच्या पिल्लांचंही आपसूकच नरभक्षक बनणं. ही शक्यता वाजवी वाटते, पण वास्तवात ती खरी नाही. कारण, माणसं वाघांची किंवा बिबट्यांची नैसर्गिक शिकार नाहीत.

पिल्लं त्यांच्या आईने जे काही आणून दिलं ते खातात. मी वाघिणीच्या पिल्लांनी माणसांना ठार करण्यात तिची मदत करतानाही पाहिलंय. पण मी असं एकही उदाहरण पाहिलेलं नाही जिथे वाघाचं पिल्लू आईच्या संरक्षणातून बाहेर पडल्यानंतर, किंवा आई ठार झाल्यानंतर, स्वतःहून माणसांना मारायला लागलं.

जेव्हा माणसं मांसाहारी प्राण्यांमुळे मारली जातात, तेव्हा अनेकदा असाप्रश्न उपस्थित होतो की ती शिकार वाघाने केली की बिबट्याने. एक सामान्य नियम असा आहे – आणि मला याला अपवाद माहीत नाहीत – की दिवसाच्या उजेडात झालेल्या सर्व हत्या वाघ करत असतो, आणि रात्रीच्या अंधारात झालेल्या हत्या बिबट्या करत असतो.

दोन्ही प्राणी अर्ध्या रात्री सक्रिय असणारे जंगलवासी आहेत, त्यांच्यासवयी समान आहेत, ते मारायच्या पद्धतीसुद्धा एकसारख्या वापरतात, आणि दोघेही माणसांना दूरवर उचलून नेण्यास सक्षम आहेत. त्यामुळे यादोघांनी एकाच वेळी शिकारीसाठी बाहेर पडावं, अशी अपेक्षा करणे स्वाभाविक आहे. पण हे घडत नाही, कारण दोघांच्यात धैर्याच्या बाबतीत फरक आहे.

वाघ जेव्हा नरभक्षक होतो, तेव्हा त्याला माणसांची भीती राहत नाही. आणि माणसं दिवसाच्या वेळी जास्त फिरतात, म्हणून तो दिवसा बळी मिळवतो. त्याला रात्री त्यांच्या वस्तीपर्यंत जाण्याची गरजच राहत नाही.

पण बिबट्या, कितीही माणसं मारो, पणतरी माणसांची भीती कधीच सोडत नाही. त्यामुळे तो दिवसा माणसांना सामोरा जाण्याचं टाळतो आणि रात्रीच शिकार करतो, किंवा रात्री त्यांच्या घरात घुसून त्यांना मारतो.

या फरकामुळे – की एक दिवसा मारतो आणि दुसरा रात्री – बिबट्यांपेक्षा नरभक्षक वाघांना मारणं सोपं असतं.नरभक्षक वाघ किती वेळा शिकार करतो, हे खालील गोष्टींवर अवलंबून असतं:

**(अ)** त्याच्या परिसरात नैसर्गिक खाद्य किती उपलब्ध आहे;

**(ब)** त्याच्या अपंगत्वाचं स्वरूप काय आहे;

**(क)** तो नर आहे की पिलांसह असलेली मादी आहे.

आपल्याला एखाद्या विशिष्ट विषयावर स्वतःचं मत बनवण्याची संधीनसते, तेव्हा आपण इतरांच्या मतांवर अवलंबून राहतो – आणि वाघांच्या बाबतीत हे विशेषतः खरं आहे. (मी इथे फक्त नरभक्षक वाघांचा नव्हे, तर एकूण वाघांचा विचार करतो आहे.)

ज्या लेखकानं खलनायकाच्या वाईट स्वभावावर भर देण्यासाठी ‘वाघा सारखा निर्दयी’ आणि ‘वाघासारखा रक्तपिपासू’ हे शब्दप्रयोग प्रथम वापरले, त्याला ज्याच्यावर तो आरोप करत होता त्या प्राण्याबद्दल किती अज्ञान होतं, हे स्पष्ट होतं. आणि त्यानं तयार केलेले हे वाक्यप्रचार इतके लोकप्रिय झाले की आज बहुसंख्य लोकांचा वाघांबद्दलचा चुकीचा समज यामुळेच निर्माण झाला आहे.

जेव्हा मी छापील अक्षरात ‘वाघासारखा निर्दयी’ किंवा ‘वाघासारखा रक्तपिपासू’ वाचतो, तेव्हा मला आठवतं एक लहान मुलगा – त्याच्याकडे एक जुनी बंदूक होती, ज्याचा एक नळीचा भाग तुटलेला होता आणि बंदुकीचा स्टॉक आणि नळया तांब्याच्या तारांनी बांधून ठेवलेल्या होत्या.तो टराई आणिभाबरच्याजंगलांमध्ये भटकत असे, त्या काळात तेव्हा आजच्या प्रत्येक वाघामागे दहा वाघ होते.

तो कुठेही रात्र पडली की झोपायचा – फक्त एक लहानशी शेकोटी पेटवून – आणि वाघांच्या डरकाळ्यांनी मधूनच जागा व्हायचा – कधी दूर, कधी अगदी जवळ. मग तो शेकोटीत अजून एक लाकूड टाकायचा आणि पुन्हा झोपी जायचा – अजिबात भीती न बाळगता. त्याला माहीत होतं, की स्वतःच्या आणि इतर अनुभवी जंगलवासियांच्या अनुभवांमधून, वाघाला जर छेडले गेले नाही, तर तो काही करत नाही.

दिवसा जर त्याला वाघ दिसला आणि टाळता आलं नाही, तर तो शांत उभा राहायचा – वाघ गेला की मग तो पुढे जायचा.

एकदा तो मोकळ्या जागेत गवत खाणाऱ्या जंगलातल्या कोंबड्यांकडे दबकत चालला होता. एका बोराच्या झुडपाजवळ पोचल्यावर उभा राहिला, वर पाहिलं, आणि त्या झुडपातून एक वाघ बाहेर आला. वाघानं त्याच्याकडे पाहिलं – जणू म्हणत होता, "अरे बाबा, तू इथे काय करतो आहेस?" आणि उत्तर न मिळाल्यावर शांतपणे वळून निघून गेला.

मग मला आठवतात हजारो पुरुष, महिला आणि मुलं – जे जंगलात काम करत असताना, गवत कापत असताना किंवा लाकडं गोळा करत असताना, रोज वाघांजवळून जात असतात...

...आणि जे लोक सुरक्षितपणे आपल्या घरी परततात, त्यांना हे देखील माहीत नसतं की ते या तथाकथित 'निर्दयी' आणि 'रक्तपिपासू' प्राण्याच्या देखरेखीखाली होते.

बोराच्या झुडपातून वाघ बाहेर पडला, त्या दिवसाला आता अर्ध शतकलोटलं आहे. या कालखंडातील शेवटची बत्तीस वर्षं मी नरभक्षक वाघांच्या शोधात आणि

पाठलागात घालवली आहेत. या काळात अशा दृष्यांचा अनुभव आला, की ज्यांना पाहून दगडालाही अश्रू आले असते. तरीही मी एकही असा प्रसंग पाहिलेला नाही, की जिथे एखादा वाघ मुद्दाम निर्दयीपणे वागला, किंवा कोणत्याही उकसणीशिवाय भूक भागवण्यापेक्षा जास्त जीव घेतले.



# Robin

# रॉबिन

मी त्याच्या आईवडिलांना कधीच पाहिलं नाही. ज्याच्याकडून मी त्याला विकत घेतलं त्या‘नाइट ऑफ द ब्रूम’ नावाच्या माणसाने सांगितलं, की तो एक स्पॅनियल[खाली पडणारे कान व रेशमी कातडी असलेला] कुत्रा आहे, त्याचं नाव पिंचाआहे आणि त्याचा बाप एक ‘हुशार शिकारी कुत्रा’ होता. त्याच्या वंशावळीबद्दल मी तुम्हाला एवढंच सांगू शकतो.

मला पिल्लू घ्यायचं नव्हतं आणि योगायोगाने, मी माझ्या एका मैत्रिणीसोबत होतो. जेव्हा सात पिलांचं टोळकं एका भयानक घाणेरड्या टोपलीतूनत तपासणीसाठी बाहेर काढण्यात आलं, तेव्हा पिंचा हे त्या टोळक्यातलं सगळ्यात लहान आणि सगळ्यात कृश पिल्लू होत आणि जगण्यासाठीच्या झुंजीत ते शेवटच्या टप्प्यावर पोचल्याचं स्पष्ट दिसत होतं.त्याचे थोडे कमी दु:खी भाऊ-बहिणी मागे सोडून, तो माझ्याभोवती एक फेरी मारून गेलाआणि मग माझ्या मोठ्या पायांच्यामध्ये येऊन गुंडाळून बसला.मी त्याला उचललं आणि कोटाच्या आत घेतलं– ती फारच बोचरी थंडी असलेली सकाळ होती– त्याने माझा चेहरा चाटून आपली कृतज्ञता दाखवायचा प्रयत्न केला आणि मी त्याच्या भयानक वासाबद्दल अनभिज्ञ असल्याचं दाखवलं.

तो तेव्हा जवळजवळ तीन महिन्यांचा होता आणि मी त्याला पंधरा रुपयांत विकत घेतलं.आता तो जवळजवळ तेरा वर्षांचा होत आहे आणि भारतातलं सगळं सोनं दिलं तरी मी त्याला विकणार नाही.

जेव्हा मी त्याला घरी आणलं आणि त्याने पहिल्यांदा पोटभर अन्न, कोमट पाणी आणि साबणाचा परिचय करून घेतला, तेव्हा आम्ही त्याचं पिंचा हे नाव काढून टाकलं आणि त्याचं नाव रॉबिन ठेवलं– त्या विश्वासू म्हाताऱ्या कॉली कुत्र्याच्या स्मरणार्थ, ज्याने चार वर्षांचा माझा लहान भाऊ आणि सहा वर्षांच्या मला स्वतःला एका उग्र अस्वलिणीच्या हल्ल्यातूनवाचवलं होतं.

रॉबिनने नियमित जेवणाला तशीच प्रतिक्रिया दिली, जशी कोरड्या जमिनीला पावसाची असते. तो आमच्यासोबत काही आठवडे राहिल्यानंतर, या तत्त्वावर की मुलाचं आणि पिलाचं प्रशिक्षण कधीच लवकर सुरू होऊ शकत नाही. मी एका सकाळी त्याला बाहेर घेऊन गेलो. त्याच्यापासून थोडं लांब जाऊन दोन-चार गोळ्या झाडाव्यात आणि त्याला गोळीबाराच्या आवाजाची सवय व्हावी, असा माझा उद्देश होता.

आमच्या मालमत्तेच्या खालच्या टोकाला दाट काटेरी झुडुपं होती आणि मी त्यांच्याभोवती फेरी मारत असताना एक लांडोर उडाली आणि माझ्या पायाशी मागे येणाऱ्या रॉबिनचा विसर पडून मी ती पक्षीण खाली पाडली.ती काटेरी झुडुपांत पडली आणि रॉबिन तिच्या मागोमाग धावत गेला. झुडुपं फारच दाट आणि काटेरी असल्याने मी त्यात जाऊ शकलो नाही, म्हणून मी त्या झुडुपांच्या पलीकडे धावलो, जिथे मोकळं मैदान होतं आणि त्याच्यापुढे घनदाट झाडं आणि गवताचं जंगल होतं, जिथे ती जखमी लांडोर पळून जाणार, हे मला ठाऊक होतं. मोकळं मैदान सकाळच्या सूर्यप्रकाशाने उजळून निघालं होतं. माझ्याकडे चित्रपटाचा कॅमेरा असता तर मला

एक अनोखा चित्रपट टिपण्याची संधी मिळाली असती.ती लांडोर, म्हातारी होती, मानेची पिसे अगदी काटकोनात उभी राहिलेली आणि एक पंख मोडलेला, अशी ती जंगलाकडे धावत होती, तर रॉबिन, शेपटीला घट्ट पकडून, जमिनीवर ओढला जात होता.

मी पुढे धावत जाऊन फारच मूर्खपणाने पक्षिणीला मान पकडून जमिनीवरून वर उचललं, आणि तिने लगेच दोन्ही पायांनी जोरदार झटके देऊन रॉबिनला पालथं टाकलं. क्षणात तो पुन्हा उठून उभा राहिला, आणि मी जेव्हा ती मेलेली पक्षीण खाली ठेवली, तेव्हा तो तिच्याभोवती नाचू लागला, कधी डोक्याजवळ, तर कधी शेपटीजवळ हलके फटके मारू लागला.

हे सांगणं अवघड होतं की आम्हा दोघांपैकी कोण जास्त अभिमानी होतं रॉबिन, की मी. घाणेरड्या टोपलीतून असा एक हुशार साथीदार मी निवडला होता. त्याच्या पहील्या भक्ष्याला घरी आणल्यामुळे, रॉबिन भलताच आनंदी झाला होता. शिकार हंगाम आता संपत आला होता आणि पुढील काही दिवस रॉबिनला बटेर, कबुतर आणि एखादंदुसरं तितर यांच्यापेक्षा मोठं काहीही दिलं गेलं नाही.

उन्हाळा आम्ही डोंगरावर घालवला, आणि नोव्हेंबरमध्ये, आमच्या वार्षिक पायथ्याच्या गावाकडे जाणाऱ्या स्थलांतरात, पंधरा मैलांच्या लांब प्रवासाच्या शेवटी, जेव्हा आम्ही एक वळण घेतलं, तेव्हा मोठ्या लंगूरांच्या (एंटेलस माकडांच्या) टोळीतलं एक माकड डोंगरावरून उडी मारून रॉबिनच्या नाकासमोरून काही इंचां वरून रस्ता ओलांडून गेलं. माझ्या शिट्टीकडे दुर्लक्ष करून रॉबिन लंगूरच्या मागे दरीकडे धावला, आणि लंगूर लगेच झाडावर चढून सुरक्षिततेत गेलं.

जमीन मोकळी होती, इथे-तिथे थोडी झाडं होती. चाळीस-पन्नास गज तीव्र उतारानं खाली गेल्यावर काही गज सपाट जागा होती, आणि नंतर पुन्हा तीव्र उतार

दरीत उतरत होता. या सपाट जागेच्या उजव्या बाजूला काही झुडुपं होती, ज्यातून पावसाच्या पाण्याने खोल गटार तयार झालं होत.

रॉबिन या झुडुपात शिरला आणि लगेच बाहेर आला—कान डोक्याला चिकटलेले, शेपटी पोटात दाबलेली—आणि त्याच्यामागे एक प्रचंड बिबट्या उड्या मारत, प्रत्येक उडीत त्याच्याजवळ पोचत येत होता. मी निःशस्त्र होतो आणि मी देऊ शकणारी एकमेव मदत म्हणजे माझ्या फुफ्फुसांच्या टोकाला पोचेल अशा ताकदीनं‘हो’ आणि ‘हर’ओरडणं ही होती. मॅडमचे डोलीवाले पुरुषही जोरात ओरडू लागले आणि शंभराहून अधिक लंगूरांनी वेगवेगळ्या सूरात आपले इशारे देणारे आवाज काढल्यावर गोंधळ शिगेला पोचला.

पंचवीस-तीस गज ही निखळ आणि असमान शर्यत सुरू राहिली, आणि जसं बिबट्या रॉबिनपर्यंत पोचणार होता, तसाच तो अचानक वळला आणि दरीत नाहीसा झाला, तर रॉबिन डोंगराच्या खांद्याभोवती फेरी मारून पुन्हा रस्त्यावर आमच्याजवळ आला.

या थरारक प्रसंगातून रॉबिननं दोन धडे शिकले, जे तो आयुष्यभर विसरला नाही —पहीला, लंगूरांचा पाठलाग करणं धोकादायक आहे, आणि दुसरा, लंगूरांचा इशारतीचा आवाज म्हणजे बिबट्याची उपस्थिती.

रॉबिनचं प्रशिक्षण जिथे थांबलं होतं तिथून पुन्हा सुरू झालं, पण लवकरच लक्षात आलं की लहानपणीच्या उपासमारीमुळे आणि दुर्लक्षामुळे त्याच्या हृदयावर परिणाम झाला होता, कारण आता तो थोड्याशा कष्टानंतर बेशुद्ध पडायचा.

एखाद्या शिकारी कुत्र्यासाठी यापेक्षा निराशाजनक काहीच नाही की त्याचा मालक बाहेर जातो आणि त्याला घरी ठेवून जातो. पक्षीशिकारी आता रॉबिनसाठी

बंद झाल्यामुळे मी त्याला मोठ्या शिकारीला घेऊन जाऊ लागलो. तो या नवीन प्रकारच्या खेळात अगदी बदक जसं पाण्यात जातं तसा रमला, आणि त्या दिवसापासून मी रायफल घेऊन बाहेर पडलो की तो माझ्यासोबत असतो.

आम्ही जी पद्धत वापरतो ती अशी—सकाळी लवकर बाहेर पडायचं, बिबट्या किंवा वाघाचे ठसे शोधायचे आणि त्यांचा पाठलाग करायचा. ठसे दिसत असतील तेव्हा मी पाठलाग करतो, आणि जेव्हा प्राणी जंगलात शिरतो तेव्हा रॉबिन ठसे ओळखतो.अशा रीतीनं आम्ही कधीकधी मैलोनमैल प्राण्याच्या मागावर राहिलो आहोत.

शिकार करताना झाडावरच्या मचाणावरून शिकार करण्यापेक्षा किंवा हत्तीच्या पाठीवरून गोळी झाडण्यापेक्षा,पायी चालून एखाद्या प्राण्याला लगेच ठार करणं, सोपं असतं. कारण, जखमी प्राण्याच्या मागे पायी जावं लागतं तेव्हा बेपर्वा गोळया झाडल्या जात नाहीत, आणि प्राण्याच्या बरोबरीत उभं राहून गोळी झाडली की त्याचे महत्त्वाचे अववयव जास्त सहज सापडतात.

तरीही, खूप काळजी घेतल्यानंतरही मी कधीकधी फक्त बिबटे किंवा वाघ जखमी केले आहेत, जे दुसऱ्या-तिसऱ्या गोळीपर्यंत हिंडत राहिले आहेत. आणि आम्ही दोघांनी एकत्र शिकार केलेल्या त्या सगळया वर्षांत फक्त एकदाच रॉबिन मला कठीण प्रसंगात टाकून गेला होता. त्या दिवशी तो थोडा वेळ नाहीसा झाल्यानंतर परत आल्यावर आम्ही ठरवलं की...पुन्हा असा प्रसंग येता कामा नये.

तो प्रसंग तिथेच संपला आणि पुन्हा कधी त्याचा उल्लेख झाला नाही, पण आता आम्ही वयस्क झालो आहोत आणि कदाचित कमी संवेदनशीलही. रॉबिन– ज्याने कुत्र्यांच्या मापानुसार सत्तर वर्षांचं वय ओलांडलं आहे आणि जो माझ्या पायाशी पडलेला आहे, त्या खाटेवरून पुन्हा कधी उठणार नाही– त्याच्या शहाण्या

तपकिरी डोळयांतल्या हसऱ्या चमकीने आणि त्याच्या छोट्या शेपटीच्या हलक्याशा हालचालीने मला ही गोष्ट सांगण्याची परवानगी दिली आहे.

जोपर्यंत तो दाट झुडपातून बाहेर येऊन उभा राहीला नाही तोपर्यंत आम्हाला तो बिबट्या दिसलाच नाही आणि आम्ही डाव्या खांद्यावरून मागे वळून पाहीलं नाही.

तो एक प्रचंड मोठा नर बिबट्या होता, त्याचा काळा, चकचकीत कातडीचा अंगरखा श्रीमंत मखमली पार्श्वभूमीवर कोरलेल्या नक्षीप्रमाणेउठूनदिसणाऱ्या ठिपक्यांनी भरलेला होता.मी त्याच्या उजव्या खांद्यावर पंधरा गज अंतरावरून बंदुकीने अचूक गोळी झाडली. गोळी किती थोडक्यात हृदयाला लागायची चुकली,याला काही महत्त्व नव्हतं; गोळी पन्नास गजांवर माती उडवत असतानाच तो हवेत उंच गेला, उलटी उडी मारून पुन्हा त्या दाट झुडपात पडला, जिथून तो मिनिटभर आधी बाहेर आला होता.

वीस, चाळीस, पन्नास गजांपर्यंत आम्हाला तो झुडपात धडाधड पळताना ऐकू आला, आणि मग आवाज जितक्या अचानक सुरू झाला होता तितक्याच अचानक थांबला. हा आवाज थांबणं दोन कारणांनी असू शकत होतं: बिबट्या पडलाच आणि मरून गेला, किंवा पन्नास गजांवर तो मोकळया जागेत पोचला.

त्या दिवशी आम्ही खूप चाललो होतो; सूर्य मावळत आला होता आणि आम्ही अजून चार मैल घरापासून दूर होतो.जंगलाचा हा भाग मानवी वस्तीपासून दूर होता, रात्री कोणी तिकडे जाण्याची लाखात एकही शक्यता नव्हती, आणि सर्वात मोठं कारण म्हणजे मॅडम निःशस्त्र होत्या, त्यांना एकटं सोडता येत नव्हतं किंवा जखमी बिबट्याच्या मागे घेऊनही जाता येत नव्हतं– म्हणून आम्ही उत्तर दिशेला वळलो आणि घरी निघालो. जागा लक्षात ठेवण्याची मला गरज नव्हती; मी

जवळजवळ अर्ध्या शतकभर या जंगलात दिवस-रात्र फिरलो होतो, आणि डोळे बांधले तरी कुठेही पोचू शकलो असतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी पहाट फक्त उगवत होती, तेव्हा रॉबिन– जो मागच्या संध्याकाळी आमच्यासोबतन

नव्हता– तो आणि मी चालत राहीलो आणि मी गोळी झाडलेली जागा गाठली. खूप काळजीपूर्वक पुढे जात रॉबिननं बिबट्या जिथे उभा होता ती जागा तपासली, मग डोकं वर करून हवेत वास घेत तो झुडपाच्या टोकाला गेला जिथे बिबट्या पडताना मोठमोठे रक्ताचे डाग सोडून गेला होता.

गोळी कुठे लागली हे ठरवण्यासाठी मला रक्त तपासण्याची गरज नव्हती; इतक्या जवळच्या अंतरावरून मी गोळी लागतानाच पाहिलं होतं, आणि दूरच्या बाजूला उडालेली धूळ याचा पुरावा होती की गोळी बिबट्याच्या शरीरातून आरपार गेली होती.

नंतर कदाचित रक्ताच्या खुणा पाठलागासाठी उपयोगी पडल्या असत्या, पण आत्ता चार मैल अंधारात चालल्यानंतर थोडी विश्रांती घेणं वाईट ठरणार नव्हतं, उलट कदाचित फार उपयोगी ठरणार होतं. सूर्य उगवण्याच्या जवळ आला होता, आणि त्या पहाटेच्या वेळी जंगलातील सगळे जीव हालचालीत होते; जखमी प्राण्याबद्दल ते काय सांगतात, हे ऐकणं पुढे जाण्याआधी शहाणपणाचं होतं.

जवळच्या झाडाखाली मला दंवाने न भिजलेली कोरडी जागा सापडली, आणि रॉबिन माझ्या पायाशी पहुडला असताना मी सिगारेट संपवली, तेव्हा डाव्या समोरच्या साठ गजांवरून एक चितळ मादी, मग दुसरी, आणि तिसरी अशी हाका मारू लागली. रॉबिन उठून बसला, हळूहळू डोकं वळवून माझ्याकडे पाहीलं, आणि

माझ्या नजरेला नजर मिळताच तितक्याच हळूवारपणे हाका देणाऱ्या चितळांच्या दिशेनं परत वळला.

त्याने पहिल्यांदा लंगूरचा इशारा ऐकलेल्या दिवसापासून अनुभवाच्या रस्त्यावर तो खूप दूर आला होता,

त्याला माहीत होतं की चितळ जंगलातल्या सगळयांना बिबट्याच्या उपस्थितीचा इशारा देत होते आणि आता त्याला– जसं ऐकणाऱ्या सगळया पक्षी-प्राण्यांना कळलं होतं तसं – ते समजलं होत.

त्या सकाळी घरातून निघताना मी मागच्या संध्याकाळी वापरलेली .275 रायफल घेतली होती. लांब अंतर पार करायचं असेल तर ही रायफल चांगली, पण जखमी बिबट्याला सामोरं जायचं असेल तर हे शस्त्र योग्य नव्हते.म्हणून सरळ पुढे जाण्याऐवजी मी असा मार्ग निवडला की ज्यामध्ये आम्ही पडलेल्या झाडापासून पंधरा यार्ड अंतरावर आणि झाडाशी समांतर चालत होतो. पायापायानं, रॉबिन आणि मी पुढे सरकत होतो. फांद्या मागे टाकून आम्ही झाडाच्या बुंध्याच्या समोर आलो, तेव्हा रॉबिन थांबला.

त्याने दाखवलेली दिशा मी पाहिली आणि लगेच मला समजलं की त्याचं लक्ष कशाकडे आहे—बिबट्याची शेपटी हळूहळू वर जात होती आणि तितक्याच हळूवारपणे खाली येत होती—हल्ला करण्यापूर्वी बिबट्या नेहमी देतो तो इशारा.टाचांवर उजवीकडे वळून मी रायफल खांद्यावर घेतली, इतक्यात बिबट्या झुडपांतून बाहेर पडला आणि आमच्यावर झेपावला. मी झेप अडवण्याच्या उद्देशानं, मारण्याचा किंवा लागेल अशी आशाही न बाळगता झटपट गोळी झाडली. गोळी त्याच्या पोटाखालून गेली आणि डाव्या मांडीच्या मांसल भागाला लागली.

रायफलचा आवाज, जखमेपेक्षा जास्त, त्याला थोडंसं वळवून गेला आणि तो माझ्या उजव्या खांद्यावरून न लागता पुढच्या झुडपांत गायब झाला.

रॉबिन माझ्या पायाशीच होता.आम्ही आता बिबट्या ज्या ठिकाणाहून गेला तिथली तपासणी केली. भरपूर रक्त सापडलं, पण ते जुन्या जखमा उघडल्यामुळे होतं की माझ्या गोळीमुळे झालं होतं, हे सांगता येईना. रॉबिनला मात्र याची काहीही पर्वा नव्हती; त्यानं लगेचच पाऊलवाट धरली.

काही दाट जंगलं पार करून आम्ही एका जागी आलो जिथे गुडघ्याएवढी झुडपं होती. सुमारे दोनशे यार्ड गेल्यानंतर माझ्या नजरेसमोर बिबट्या उठला, पण मी रायफल रोखण्याआधीच तो लॅन्टाना झुडपाखाली नाहीसा झाला. हे झुडप जमिनीवर टेकलेल्या फांद्यांसकट इतकं मोठं होतं की जणू एखाद्या झोपडीच्या तंबूसारखं, आणि बिबट्याला उत्तम आडोसा देणारं होतं. शिवाय त्याला हल्ला करण्यासाठीही योग्य जागा होती.

त्या सकाळचा आमचा अनुभव बरा झाला होता, आणि माझ्याकडे योग्य शस्त्र नसताना पुढे जाणं म्हणजे मूर्खपणा झाला असता. त्यामुळे आम्ही परत फिरलो आणि घरी आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही तिथे गेलो.जंगलात सकाळी मिळणाऱ्या सगळया सुगंधांकडे दुर्लक्ष करून रॉबिननं मला चार मैल धावत जाण्यासंही प्रवृत्त केलं असतं.

यावेळी मी 450/400 रायफल घेतली होती, त्यामुळे कालच्यापेक्षा जास्त आत्मविश्वास वाटत होता. लॅन्टाना झुडपापासून काहीशे यार्ड अंतरावर मी रॉबिनला हळू चालायला सांगितलं. कारण जखमी प्राणी नेहमी जिथे सोडला तिथेच असेल, असं गृहित धरणं धोकादायक ठरतं—आणि खाली दिलेला प्रसंग त्याचा पुरावा आहे.

माझ्या एका ओळखीच्या शिकाऱ्यानं एका दुपारी वाघ जखमी केला आणि काही मैल त्याच्या रक्ताच्या पाऊलवाटेवरून गेला. दुसऱ्या दिवशी तो काही माणसांसह परत गेला. त्यांच्यातला एकजण, जो स्थानिक शिकारी होता, रिकामी रायफल घेऊन पुढे चालला होता. अजून एक मैल अंतरावर असतानाच तो थेट जखमी वाघावर गेला आणि ठार झाला.बाकीचे काही झाडावर चढून तर काही पळून वाचले.

मी लॅण्टाना झुडपाचं अचूक ठिकाण नोंदवलं होतं, आणि आता मी रॉबिनला वाऱ्याच्या विरुद्ध बाजूने काही गजांवरून जाणाऱ्या रेषेवरून घेऊन गेलो. वारा ओलांडून प्राण्याचं ठिकाण शोधण्याच्या या पद्धतीबद्दल रॉबिनला जे काही जाणून घेणं आवश्यक होतं ते सगळं माहीत होतं आणि आम्ही फारसं पुढे गेलो नव्हतो, अजून शंभर गजांवर होतो, तेव्हा तो थांबला, वाऱ्याकडे तोंड करून उभा राहीला आणि मला सांगितलं की त्याला बिबट्याचा वास येतोय. मागच्या दिवशीप्रमाणेच तो एका पडलेल्या झाडाकडे तोंड करून उभा होता, जे दाट झुडपांच्या काठाशी समांतर पडलेलं होतं, जिथून आम्ही बिबट्याचा माग काढत लॅण्टाना झुडपापर्यंत पोचलो होतो, जेव्हा त्याने आमच्यावर हल्ला केला होता. झाडाच्या आमच्या बाजूला मोकळं मैदान होतं, पण पलीकडे कमरेइतक्या उंच बासोंटा झुडपांची दाटी होती.

रॉबिनला मूळ रेषेवर पुढे जायचा इशारा देऊन आम्ही लॅण्टाना झुडपाजवळून गेलो, पण त्याला त्यात अजिबात रस नव्हता. पुढे, पावसाच्या पाण्याने वाहून गेलेल्या नाल्यात आलो. इथे मी माझा कोट काढून घेतला, त्यात जितके दगड मावतील तितके भरले आणि तो तात्पुरता पोत्यासारखा खांद्यावर टाकून झाडाजवळच्या मोकळ्या जागेत परत आलो.

कोट पुन्हा घालून, रायफल सज्ज ठेवून, मी झाडापासून पंधरा गजांवर जागा घेतली आणि दगड फेकायला सुरुवात केली—आधी झाडावर, मग पलीकडच्या झुडपात—ह्याच उद्देशाने की, जर बिबट्या जिवंत असेल, तर तो मोकळ्या मैदानात हल्ला करायला येईल आणि मी त्याला तिथे सामोरं जाऊ शकेन. सगळे दगड संपल्यावर मी खोकलो, टाळ्या वाजवल्या, ओरडलोही; पण ना दगडफेकी दरम्यान ना नंतर बिबट्याने काही हालचाल केली, ना आवाज केला.

आता मी सरळ झाडाकडे जाऊन पलीकडचं पाहीलं असतं, तरी चुकीचं ठरलं नसतं; पण एक जंगलातली जुनी म्हण आठवली—'बिबट्या मेला असं त्याची कातडी काढल्याशिवाय कधीच समजू नका'—म्हणून मी झाडाला मोठ्या वर्तुळात वळसा घालायचं ठरवलं, हळूहळू वर्तुळ लहान करत झाडाच्या फांद्यांखाली आणि खोडाच्या संपूर्ण लांबीवर नजर टाकायचा विचार केला. पहील्या वर्तुळाची त्रिज्या मी पंचवीस गज ठेवली, आणि दोन-तृतीयांश वळसा पूर्ण झाला असता रॉबिन थांबला.

मी खाली पाहीलं तर एकामागोमाग एक खोल, रागीट गुरगुर ऐकू आली, आणि बिबट्या थेट आमच्याकडे झेपावला. झुडपं जोरात हलताना दिसत होती, सरळ रेषेत आमच्याकडे, आणि मला फक्त उजवीकडे अर्धं वळून रायफल उचलायचीच उसंत मिळाली, तेवढ्यात बिबट्याचं डोकं आणि खांदे काही फूट अंतरावर झुडपातून बाहेर आले.

चितळं ज्या पद्धतीने हाका मारत होती, त्यावरून हे स्पष्ट होत होतं की बिबट्या त्यांच्या पूर्ण नजरेसमोर होता.थोडा अजून संयम बाळगला असता,तर त्यांनी आम्हाला सांगितले असते, की तो जिवंत आहे की नाही. साधारण पाच मिनिटं त्यांनी हाका मारल्या होत्या, तेव्हा अचानक, आणि सगळ्यांनी एकदमच, दोनदा

जोरात हाका मारल्या आणि मग परत नेहमीसारख्या हाका सुरू झाल्या; म्हणजे बिबट्या जिवंत होता, तो हलला होता, आणि पुन्हा शांत बसला होता. आता आम्हाला फक्त त्याची जागा कळणं गरजेचं होतं, आणि ही माहिती आम्हाला चितळांच्या मागावरून मिळणार होती.

वाऱ्याच्या उलट दिशेनं पन्नास गज पुढं गेल्यावर आम्ही दाट झुडपात शिरलो आणि चितळांच्या मागावर जायला सुरुवात केली—हे अवघड काम नव्हतं, कारण रॉबिन मांजरासारखा शांतपणे जंगलातून फिरू शकतो आणि दीर्घ सरावामुळे मी ही पाऊलं कुठं टाकायची ते शिकलेलो होतो. आम्ही त्यांच्या अगदी काही फुटांवर पोचेपर्यंत चितळं दिसली नाहीत.ती मोकळ्या जागेत उभी होती आणि उत्तरेकडे पाहत होती —नेमकं त्याच दिशेला, जिथं काल संध्याकाळी आवाज थांबला होता.

इथपर्यंत चितळांनी आम्हाला फार मोठी मदत केली होती; त्यांनी सांगितलं होतं की बिबट्या मोकळ्या जागेत पडलेला आहे आणि जिवंत आहे, आणि आता त्यांनी दिशा सांगितली होती. ही माहिती मिळवायला आम्हाला तासभर लागला होता, आणि आता चितळांनी आम्हाला पाहून जंगलातील सगळ्या प्राण्यांना इशारा दिला असता, तर त्यांनी आत्तापर्यंत केलेलं सगळं चांगलं काम एका सेकंदात उध्वस्त केलं असतं.

मी विचार करत होतो की परत मागे जाऊन हाका मारणाऱ्या चितळांच्या खाली जाऊन मागून गोळी झाडणं चांगलं राहील का, की बिबट्याचा आवाज करून त्यांना इथून हाकलून लावणं बरं राहील, तेव्हाच एका चितळाने डोकं वळवून माझ्या चेहऱ्यात नजर रोखली. पुढच्या क्षणातच ‘वारे मनुष्य’अशी हाक देऊन ती सगळी चितळं वेगानं पळून गेली. मला मोकळ्या जागेत पोचायला फक्त पाच गज धावावं लागणार होतं, पण जरी मी फार जलद गेलो तरी बिबट्या अजून जलद गेला, आणि

मला त्याच्या मागच्या पायांची आणि शेपटीची फक्त एक झलक मिळाली, तो झुडपांच्या मागे नाहीसा झाला.चितळांनी माझी संधी पूर्णपणे बिघडवली होती, आणि आता बिबट्याला पुन्हा शोधून काढणं आणि त्याची जागा ठरवणं आवश्यक होतं—आणि या वेळी हे काम रॉबिन करणार होता.

मी काही मिनिटं मोकळ्या जागेत उभा राहिलो, बिबट्याला शांत होण्यासाठी आणि त्याने सोडलेला वास वाऱ्यानं उडून जाण्यासाठी वेळ द्यावा म्हणून, आणि मग रॉबिनला घेऊन उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्याला ओलांडून थेट पश्चिमेकडे गेलो. आम्ही साठ-सत्तर गज गेल्यावर रॉबिन, जो पुढं चालत होता, अचानक थांबला आणि वाऱ्याच्या दिशेकडे तोंड करून उभा राहिला. रॉबिन जंगलात गप्प असतो आणि त्याचे त्याच्या मनावर अद्भुत नियंत्रण आहे. पण एक नस अशी आहे जी त्याच्या मागच्या पायांवरून जाते, जी तो कधीच आवरू शकत नाही—जेव्हा तो बिबट्याला पाहतो किंवा त्याचा वास ताजा आणि तीव्र असतो तेव्हा. ती नस आता फडफडत होती आणि त्याच्या मागच्या पायांवरील लांब केस हलवत होती.

मागच्या उन्हाळ्यात एक प्रचंड वादळ या जंगलावर आलं होतं, ज्याने अनेक झाडं उखडून टाकली होती; त्या पडलेल्या झाडांपैकी एका झाडाकडे, जिथं रॉबिन आता पाहत होता, ते झाड आम्ही उभे होतो त्या जागेपासून चाळीस गजांवर होतं. झाडाच्या फांद्या आमच्याकडे होत्या, आणि खोडाच्या दोन्ही बाजूंना हलकी झुडपं आणि इथे-तिथे गवताचे लहान झुबके होते.

कुठल्याही दुसऱ्या वेळी रॉबिन आणि मी थेट आपल्या शिकारीकडे गेलो असतो; पण यावेळी थोडं जास्त सावध राहणं आवश्यक होतं. कारण आपण ज्या प्राण्याशी सामना करणार होतो तो जखमी होता, त्यामुळे निर्भय होता; आणि

त्याचबरोबर, पंधरा तासांपासून त्याला माणसाबद्दल प्रचंड राग साठवायला मिळाला होता, त्यामुळे त्याची लढाऊ प्रवृत्ती आता पूर्णपणे भडकलेली असणार होती.

बिबट्याची झेप आणि माझा गोळीबार जवळजवळ एकाच वेळी झाले, आणि मी डावीकडे सरकून जितका मागे झुकू शकलो तितका झुकत, तो माझ्याजवळून झेपावत असताना मी बंदुकीच्या दुसऱ्या नळीने त्याच्या बाजूला कंबरभर उंचीवरून गोळी झाडली.



जखमी प्राणी—तो बिबट्या असो वा वाघ—जेव्हा जोरदार झेप घेतोआणि लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरतो, तेव्हा तो नेहमीच पुढे जातो आणि पुन्हा हल्ला करत नाही, जोपर्यंत त्याला पुन्हा त्रास दिला जात नाही.

मी रॉबिनवर पाय न येण्यासाठी डावीकडे सरकलो होतो, आणि आता मी त्याच्याकडे पाहिले, तर तो कुठेच दिसत नव्हता.इतक्या वर्षांच्या एकत्र शिकारीत हा पहीलाच प्रसंग होता की आम्ही संकटाच्या क्षणी वेगळे झालो होतो, आणि आता तो बहुतेक घरी पोचायचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करत असावा—समोर पसरलेल्या चार मैलांच्या जंगलातील असंख्य संकटांपासून वाचण्याची त्याला फारशी शक्यता नव्हती. त्यात भर म्हणजे, हे जंगल घरापासून दूर असल्यामुळे त्याला ते फारसं परिचितही नव्हतं, आणि त्याच्या हृदयाची स्थितीही चांगली नव्हती. त्यामुळेच मोठ्या काळजीत आणि चिंतेत मी त्याला शोधण्यासाठी निघालो; आणि तेव्हाच मला एका छोट्याशा मोकळ्या जागेच्या कडेला असलेल्या झाडाच्या खोडामागून त्याचं डोकं डोकावताना दिसलं. मी हात उंचावून खूण केली, तेव्हा तो पुन्हा झुडुपात शिरला; पण थोड्याच वेळात, डोळे आणि कान खाली घालून, तो शांतपणे माझ्या पायाशी येऊन उभा राहिला. मी बंदूक खाली ठेवून त्याला उचलले, आणि त्याच्या आयुष्यात दुसऱ्यांदा त्याने माझा चेहरा चाटला—त्याच वेळी तो घशातल्या छोट्या आवाजांनी मला सांगत होता की, मला सुखरूप पाहून तो किती आनंदी आहे आणि संकटाच्या क्षणी माझ्यापासून दूर झाल्याबद्दल त्याला किती लाज वाटत आहे.

अचानक आणि अगदी अनपेक्षितपणे समोर आलेल्या त्या धोक्याला आमची प्रतिक्रियाही एखाद्या कुत्र्याची आणि माणसाची संकटाच्या वेळी होणारी स्वाभाविक प्रतिक्रिया होती—जेव्हा धोका फक्त ऐकू येतो, पण दिसत नाही. रॉबिनच्या बाबतीत त्याने वेगाने आणि शांतपणे पळ काढून सुरक्षितता शोधली; तर माझ्या बाबतीत त्याने मला जागच्या जागी खिळवून ठेवलं, ज्यामुळे मागे हटणं—वेगाने असो वा हळूहळू—अशक्य झालं.

मी रॉबिनला तो आमच्या थोड्या वेळच्या विभक्त होण्याला जबाबदार नाही, याची खात्री दिल्यानंतर, आणि त्याचं छोटंसं शरीर थरथरणं थांबल्यानंतर, मी त्याला खाली ठेवलं आणि आम्ही दोघं मिळून त्या ठिकाणी गेलो, जिथे प्राणपणाने लढून शेवटची लढत जवळजवळ जिंकणारा बिबट्या मृत अवस्थेत पडला होता.

मी तुम्हाला ही गोष्ट सांगितली आहे आणि मी ती सांगत असताना,—माणसाला कधीही लाभलेला सर्वांत मोठ्या मनाचा आणि सर्वांत विश्वासू मित्र, रॉबिन—सुखी शिकारीच्या प्रदेशात गेला आहे, जिथे मला ठाऊक आहे, मी गेलो की तो माझी वाट पाहत उभा असेल.



# पिंपळपाणी ओढ्यावरील वाघ

त्याचा जन्म टेकड्यांच्या पायथ्याशी खोलवर गेलेल्या दरीत झाला होता आणि तो तीन भावंडांपैकी एक होता, एवढेच मला त्याच्या लहानपणाबद्दल माहिती आहे.

तो साधारण वर्षभराचा असावा, जेव्हा नोव्हेंबरच्या एका सकाळी चितळमादीच्या हाकांनी आकर्षित होऊन मी पिंपळपाणी नावाच्या लहानशा ओढ्याच्या वाळूमय पात्रात त्याचे ठसे पाहिले. सुरुवातीला मला वाटले की तो आपल्या आईच्या देखरेखीपासून हरवला असावा; परंतु आठवड्यागणिक त्याचे एकट्याचेच ठसे जंगलातील प्राण्यांच्या वाटांवर दिसत राहिले तेव्हा जवळ येणाऱ्या प्रजनन ऋतूचं आगमनच त्याच्या एकटेपणाचं खरं कारण असल्याचा मी निष्कर्ष काढला.जंगलातील प्राण्यांचं असंच असतं; एका दिवसात आईवडील जीव देऊनही लेकराचं रक्षण करतात आणि दुसऱ्या दिवशी त्यांना स्वतःच्या पायावर उभं राहायला सोडून देतात — जंगलातील नातेसंबंधांत जवळीक टाळण्यासाठी निसर्गाची हीच पद्धत आहे.

हिवाळ्यात त्याचं अन्न मुख्यत्वे मोर, काकड, लहान डुक्कर आणि अधूनमधून चितळमादी असं होतं. जंगलातील एका प्रचंड पण उगाचच पडलेल्या झाडाच्या पोकळ खोडात त्याने आपलं घर केलं होत. बहुधा वादळं आणि साळींदरांच्या खणण्यामुळे हे झाड पोकळ झालं होतं. इथेच तो आपलं बहुतांश भक्ष्य

आणायचा आणि थंड दिवसांत झाडाच्या गुळगुळीत खोडावर ऊन खात पडायचा— जिथे याआधीही अनेक बिबटे ऊन खात पडले होते.

जानेवारी बऱ्यापैकी पुढे गेला तेव्हा मला पहिल्यांदा हे पिल्लू जवळून दिसले.एका संध्याकाळी मी ठराविक काहीही उद्देश न ठेवता बाहेर निघालो होतो, तेव्हा एका झाडावर बसताना एक कावळा जमिनीवरून उडाला. आणि चोच झाडाच्या फांदीवर साफ केली, हे मी पाहिलं. कावळे, गिधाडं आणि नीलकंठ मला जंगलात नेहमी आकर्षित करतात; भारतात आणि आफ्रिकेत मी अशा पक्ष्यांच्या मदतीने अनेक ठिकाणी शिकारी प्राण्यांची भक्ष्यं सापडवली आहेत.

त्या दिवशी कावळ्यानं मला एका रात्रीच्या हत्याकांडाच्या ठिकाणी नेलं. एका चितळाचा वध झाला होता आणि त्याचं अर्धवट भक्षण झालं होतं आणि मी जसा त्या ठिकाणी आलो होतो, तसाच तिथून पन्नास यार्डांवरून जाणाऱ्या काही लोकांनीही ते भक्ष्य पाहीलं होतं आणि उरलेसुरले हाडं-मांस कापून नेलं होतं. फक्त काही हाडांचे तुकडे आणि गोठलेल्या रक्ताचे डाग एवढंच उरलं होतं, ज्यावरून कावळ्यानं नुकतीच आपली भूक भागवली होती.

घनदाट झुडपांचा अभाव आणि रस्त्याची जवळीक यावरून मला खात्री झाली की त्या शिकारी प्राण्यानं हे उरलेलं भक्ष्य काढून नेणं पाहिलेलं नाही आणि तो परत इथे यायचाच आहे; म्हणून मी तिथेच थांबायचं ठरवलं आणि शक्य तितक्या काटेरी झुडपांत आरामात एका प्लमच्या झाडावर बसलो.

झाडावर बसून शिकार करण्याच्या नीतिमत्तेबाबत तुमचे माझ्याशी मतभेद असतील, वाचकहो, तरीही त्याबद्दल मी माफी मागत नाही. संध्याकाळच्या सूर्यास्तापूर्वी झाडावर बसून घालवलेले काही क्षण हे माझ्या सर्वात रम्य शिकारीच्या आठवणींपैकी आहेत—ज्याने फुटलेल्या नळीचं फुटणं टाळलं होतं, त्या कधी

पितळी तारांनी गुंडाळलेल्या तोंडपुडीच्या बंदुकीसह, बिबट्याने मारलेल्या कोल्ह्याच्या जवळ बसलो होतो, तर कधी अलीकडेच, सर्वात आधुनिक बंदुकीसह, वाघीण आणि तिच्या दोन पूर्ण वाढ झालेल्या पिल्लांना सापडलेल्या सांबराच्या हरणावर ताव मारताना मी पाहत होतो आणि शिकारीचं बक्षीस न मिळाल्यामुळे स्वतःला काही कमी समजलो नाही.

आजच्या प्रसंगी माझ्याखाली कुठलंही भक्ष्य नाही, हे खरं आहे, पण दिलेल्या कारणामुळे गोळी झाडण्याची संधी त्यावर अवलंबून नाही; रक्ताने भिजलेल्या जमिनीत जंगलातील प्राण्यांना आकर्षित करणारा पुरेसा गंध आहे—याचा पुरावा म्हणजे तो म्हातारा, पांढऱ्या मिशांचा रानडुक्कर, जो गेल्या दहा मिनिटांपासून शांतपणे जमीन खोदत होता आणि जो अचानक रक्ताच्या वाऱ्याच्या रेषेत येताच सतर्क झाला. त्याचे उंचावलेले लांबट तोंड —फक्त तो डुक्करच ज्या पद्धतीने वापरतो त्या पद्धतीने—त्याला जमिनीतल्या खुणांपेक्षा खूप अधिक काही सांगते. त्याचा पद्धतशीर जवळ येण्याचा मार्ग म्हणजे —आधी उजवीकडे थोडं वळण घेऊन परत वाऱ्याच्या दिशेने, मग डावीकडे थोडं वळण घेऊन पुन्हा वाऱ्याच्या दिशेने—आणि प्रत्येक वळणानंतर थोडं थोडं जवळ येणं, यातून चितळाचा वध वाघानेच केला होता,हे स्पष्ट होतं. खाण्यासारखं काहीही शिल्लक नाही, याची खात्री करून घेऊन तो शेवटी धावत निघून जाऊन नजरेआड झाला असावा.

आता दोघांच्याही शिंगांवर मऊ मखमली आवरण असलेले, दोन चितळ समोर येतात. ते वाऱ्याच्या दिशेने खाली येत आहेत आणि थेट रक्ताळलेल्या जागेकडे जात आहेत, यावरून ते कालच्या रात्रीच्या हत्याकांडाचे साक्षीदार होते हे स्पष्ट होतं.कधी जमिनीचा वास घेत, तर कधी कुठल्याही क्षणी पळण्यासाठी सज्ज

अशा ताठ झालेल्या देहबोलीत उभं राहून, त्यांनी आपली जिज्ञासा भागवली आणि परत ज्या वाटेने आले त्या वाटेने निघून गेले.

जिज्ञासा ही फक्त माणसाची मक्तेदारी नाही: कित्येक प्राण्यांचा जीव तिच्या मोहाला बळी पडून जातो.कुत्रा ओसरीवरून सावलीवर भुंकायला जातो, हरीण कळप सोडून वाऱ्यानेही न हललेली गवताची जुडी तपासायला जातं, आणि वाट पाहणाऱ्या बिबट्याला त्याचं जेवण मिळतं.

हिवाळ्यातील सूर्यास्ताची रेषा जवळ येत असताना समोर उजव्या बाजूला काही हालचाल दिसते.काटेरी झुडपांच्या टोकाशी दोन झुडपांच्यामध्ये असलेल्या मोकळ्या जागेतून एक प्राणी ओलांडून गेला आहे. काही वेळात माझ्या टोका कडच्या झुडपांत फट पडते आणि उजवीकडे किंवा डावीकडे न पाहता ते पिल्लू उघड्यावर पाऊल टाकते. थेट आपल्या भक्ष्याच्या जागेवर ते पोचते, पण तिथे आपलं चितळ—कदाचित तासन्तासांच्या संयमी पाठलागानंतर मारलेलं—नसल्याचं पाहून त्याचा उत्सुकतेचा भाव निराशेत बदलतो. हाडांचे तुकडे आणि गोठलेलं रक्त तो वर्ज्य करतो आणि नुकत्याच कसायाच्या पाटीप्रमाणे वापरलेल्या झाडाच्या बुंध्याकडे त्याचं लक्ष लागतं, ज्यावर अजून काही मांसाचे तुकडे चिकटलेले असतात.

या जंगलात बंदुक घेऊन फिरणारा मी एकटाच नव्हतो, आणि त्या पिल्लाला जर वाघ व्हायचा असेल, तर त्याला दिवसा निष्काळजीपणे भक्ष्याजवळ जाण्याचा धोका शिकवणं आवश्यक होतं. गोळयांची उधळण करणारी बंदूक आणि धुळीचे चिमुकले शिसे यासाठी अधिक योग्य ठरले असते, पण यावेळी रायफलवरच समाधान मानावं लागणार होतं; आणि जसे त्याने बुंध्याचा वास घेण्यासाठी डोकं वर

केलं, तशी माझी गोळी त्याच्या नाकापासून एका इंचावर असलेल्या कठीण लाकडावर आपटली.

पुढील अनेक वर्षांत फक्त एकदाच ते पिल्लू हा धडा विसरले.

पुढच्या हिवाळ्यात मी त्याला अनेकदा पाहीलं.आता त्याचे कान इतके मोठे वाटत नव्हते आणि त्याने पिल्लावस्थेतील पातळ केसांचा त्याग करून गडद पिवळट-तांबूस रंगाचा आणि स्पष्ट पट्ट्यांचा सुंदर फर मिळवला होता. ते पोकळ झाड आता त्याच्या खऱ्या मालकांच्या—बिबट्यांच्या—हक्कात गेलं होतं. त्याने पायथ्याच्या टेकड्यांना लागून असलेल्या दाट झुडपांमध्ये नवं ठिकाण शोधलं होतं आणि त्याच्या आहारात आता तरुण सांबराचाही समावेश झाला होता.

पुढच्या हिवाळ्यात मी डोंगरावरून नेहमीप्रमाणे खाली आलो, तेव्हा शिकारवाटांवर आणि पाणवठ्यांवर ओळखीचे पाऊलांचे ठसे दिसेनासे झाले होते. अनेक आठवडे मला वाटत होतं की पिल्लू आपली जुन्या वावराची ठिकाणं सोडून दूर गेला आहे. मग एके सकाळी त्याच्या गैरहजेरीचा उलगडा झाला कारण त्याच्या ठशांबरोबरच दुसऱ्या एका वाघिणीचे—त्याने शोधलेल्या सोबतीणीचे—लहान आणि लांबट ठसे होते. मी फक्त एकदाच त्या, आता पिल्लू झालेल्या वाघाला एकत्र पाहिलं होतं.

त्या दिवशी मी पहाटेपूर्वी पायथ्याच्या डोंगरांत राहणाऱ्या सरोवराजवळ आशियाई हरिणाची शिकार करण्यासाठी बाहेर पडलो होतो, आणि परतताना जंगलातील वाटेवर माझं लक्ष एका गिधाडाकडे गेलं, जे साळाच्या झाडाच्या सुकलेल्या फांदीवर बसलं होतं.

तो पक्षी माझ्याकडे पाठ करून बसला होता आणि समोर दाट जंगलाला लागून असलेल्या झुडपांच्या छोट्या पट्ट्याकडे पाहत होता.जमिनीवर अजून दंवाचा थर होता आणि कुठलाही आवाज न करता मी त्या झाडापर्यंत पोचलो आणि आजूबाजूला डोकावून पाहिलं. एका मृत सांबराचं शिंग झुडपांच्यावर दिसत होतं—कारण एखादं जिवंत हरिण अशा स्थितीत कधीच पडलेलं नसतं. शेवाळ्याने झाकलेल्या एका सोयीस्कर दगडानं माझ्या रबरी सोल असलेल्या बुटांना निःशब्द आणि सुरक्षित आधार दिला, आणि मी उभा राहताच सांबर पूर्णपणे दिसू लागला. त्याचा मागचा भाग खाल्लेला होता आणि भक्ष्याच्या दोन्ही बाजूला ती जोडी—वाघीण एका बाजूला आणि वाघ दुसऱ्या बाजूला, दोघेही झोपलेले होते.त्यांचे फक्त मागचे पाय दिसत होते—

समोर दहा फूट पुढे, एका सुकलेल्या फांदीला टाळून, मी डावीकडे तीस फूट गेलो असतो,तर मला वाघाच्या मानेवर गोळी झाडता आली असती; पण या दबक्या हालचालीच्या आराखड्यात मी त्या शांत प्रेक्षकाचा विचारच केला नव्हता. जिथे मी उभा होतो तिथून त्याला मी दिसत नव्हतो, पण तो दहा फूट पुढे गेल्यावर मी त्याच्या दृष्टीस पडणार होतो आणि माझ्या इतक्या जवळीकीनं घाबरून त्यानं आपल्या फांदीवरून उडी मारली. उडताना त्याच्या वरच्या फांदीवरून खाली आलेल्या एका पातळ वेलीकडे त्याचं लक्षच गेलं नाही, त्यामुळे तो त्यावर आदळला आणि लाजिरवाण्या पद्धतीने जमिनीवर कोसळला.वाघीण क्षणात उठली आणि भक्ष्य व सोबती वाघांना एकाच उडीत ओलांडून पळाली; वाघही लगेच मागे लागला. एक शक्यताजन्य गोळी झाडण्याची संधी होती, पण समोर दाट जंगल असल्यामुळे ती खूपच धोकादायक ठरली असती—कारण जखमी झालेला प्राणी मग सगळा फायदा घेतो. ज्यांनी कधी प्रयत्न केला नाही, त्यांना मी सांगू शकतो की,

बिबटे आणि वाघ यांच्या भक्ष्यावर दबक्या हालचालीने जाणं ही अत्यंत रंजक शिकारीची पद्धत आहे. मात्र गोळी झाडताना फार काळजी घ्यायला हवी; कारण प्राणी जागीच न मारल्यास किंवा जागीच पाडला नाही, तर पुढे त्रास ओढवणं निश्चित असतं.

एक आठवड्यानंतर वाघ परत एकाकी जीवनात गेला. त्याच्या स्वभावात आता बदल झाला होता.

आतापर्यंत त्याला माझं त्याच्या भक्ष्याजवळ जाणं काही वाटलं नव्हतं, पण जोडीदार गेल्यानंतर पहील्याच वेळेस मी त्याच्या ओढलेल्या भक्ष्याजवळ गेलो तेव्हा त्यानं स्पष्टपणे दाखवून दिलं, की आता पुढे कुठलाही वचक न दाखवता परवानगी दिली जाणार नाही. वाघाचा रागाने केलेला गुरगुर आवाज—जो जंगलातला सर्वात भयानक आवाज आहे—किती भीतीदायक असतो, हे ऐकल्यावरच समजतं.

मार्चच्या सुरुवातीला वाघानं पहिल्यांदा एका पूर्ण वाढ झालेल्या म्हशीचा वध केला.एका संध्याकाळी मी पायथ्याच्या डोंगराजवळ होतो, तेव्हा म्हशीच्या विव्हळ किंकाळ्या आणि वाघाच्या संतापलेल्या गर्जना जंगलभर घुमल्या.मी आवाजाचं ठिकाण सुमारे सहाशे यार्डांवरील दरीत शोधलं. रस्ता फारच कठीण होता—सैल दगडांवरून आणि काटेरी झुडपांतून जावं लागत होतं—आणि जेव्हा मी तीव्र चढावरून रांगत वर पोचलो, तेव्हा म्हशीचा झगडा संपलेला होता आणि वाघ कुठेच दिसत नव्हता.

मी तासभर बोट ट्रिगरवर ठेवून वाघाच्या दर्शनाची वाट पाहत पडलो होतो, पण तो दिसलाच नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे मी पुन्हा चढावर रांगत वर गेलो, तर म्हैस जशीच्या तशी पडलेली होती. खुर आणि नखांनी फाडलेली मऊ जमीन त्या

झगड्याची तीव्रता दाखवत होती; म्हशीला जेव्हा मागून जखमी करण्यात आलं, तेव्हा वाघानं तिला खाली पाडण्यात यश मिळवलं होतं—हा झगडा दहा ते पंधरा मिनिटे चालला होता.

वाघाचे ठसे दरीपलीकडे गेले होते, आणि त्यांचा माग काढताना मला एका दगडावर रक्ताचा लांब डाग सापडला आणि शंभर यार्डांवर एका पडलेल्या झाडावर आणखी एक डाग दिसला. म्हशीच्या शिंगांनी वाघाच्या डोक्यावर केलेली जखम इतकी गंभीर होती की तो त्या भक्ष्याकडे परत कधीच फिरकला नाही.

तीन वर्षांनी वाघानं, पिल्लू असताना मिळालेला धडा न जुमानता (कदाचित त्याचा बहाणा असा असेल की वाघांच्या शिकारीचा हंगाम बंद होता).जिथे एक जमीनदार आणि त्याचे शेतकरी रात्री बसले होते, तिथे निष्काळजीपणे एका भक्ष्याजवळ परत येऊन, खांद्यावर गोळी घेतली; ज्यामुळे हाड मोडलं. त्याचा पाठलाग करण्याचा काहीही प्रयत्न झाला नाही, आणि छत्तीस तासांनी, खांदा जखमेवरील माशांनी गजबजलेला असताना, तो तपासणी बंगल्याच्या आवारातून लंगडत गेला, पूल ओलांडला—ज्याच्या पलीकडे दुतर्फा वसलेल्या घरांचे लोक दारात उभे राहून त्याला पाहत होते—आणि एका भिंतींनी वेढलेल्या आवाराच्या गेटमधून आत शिरून रिकाम्या गोदामात ताबा मिळवून बसला.

चोवीस तासांनी, बहुधा शेजारच्याखेड्यांतून आलेल्या लोकांच्या गर्दीमुळे घाबरून, त्यानं ज्या वाटेनं आत शिरला त्याच वाटेनं बाहेर पडून आमच्या गेटजवळून गेला आणि गावाच्या खालच्या टोकाकडे निघाला.

आमच्या एका भाडेकरूचा बैल मागच्या रात्री मेलेला होता ; वाघाला तो सापडला आणि त्याला झुडपांत ओढून नेण्यात आलं होतं.वाघाचे ठसे दरीपलीकडे गेले होते,

पाण्याची तहान शेतातील पाटातून भागवत,काही दिवस तो तिथेच राहीला.

दोन महिन्यांनी आम्ही डोंगरावरून खाली आलो तेव्हा वाघ गावाच्या कडेला मिळणाऱ्या छोट्या प्राण्यांवर (वासरे, मेंढ्या, शेळयाइ.)जगत होता. मार्चपर्यंत त्याची जखम भरून आली होती, पण त्यामुळे त्याचा उजवा पाय आत वळलेला राहीला. तो ज्या जंगलात जखमी झाला होता तिथे परतला आणि गावच्या गुरांवर त्याने मोठा कहर हल्ला केला. मात्र सुरक्षिततेसाठी तो प्रत्येक जनावरावरून फक्त एकदाच जेवायचा, त्यामुळे साधारण संख्येपेक्षा पाचपट जनावरं त्याने मारली. ज्यांनी त्याला जखमी केलं होतं आणि ज्यांच्याकडे चारशे गाई-म्हशींचा कळप होता, त्या जमीनदाराचं नुकसान सगळयात जास्त झालं.

पुढील काही वर्षांत त्यानं आकारात जितकी वाढ केली तितकीच त्याची कीर्तीही वाढली आणि त्याला मारण्यासाठी अनेक शिकारी आणि इतरांनी प्रयत्न केले.

एका नोव्हेंबरच्या संध्याकाळी, ज्याच्याकडे एकनळी तोंडपुडीची बंदूक होती, त्या एका गावकऱ्यानं डुकराची शिकार करण्यासाठी मोहीम हाती घेतली.त्याने निवडलेलं ठिकाण म्हणजे तुटक जमिनीच्या मध्यभागी वाहणाऱ्या, वीस यार्ड रुंद असलेल्या सुक्या नाल्यातील एका एकाकी झुडपाचं. ही जमीन चौरस होती—लांब बाजूंना शेती, तर दुसऱ्या छोट्या बाजूला दहा फूट खोल कालवा, जो आमच्या शेती आणि जंगलाची सीमा निर्देश करत होता. त्या माणसाच्या समोर, ज्याच्या वरून गुरांची वाट जात होती; मागे दाट झुडपांचा पट्टा होता.

रात्री आठ वाजता त्या वाटेवर एक प्राणी दिसला, आणि जितकं नीट लक्षात घेता आलं तितकं घेऊन,त्यानं गोळी झाडली.गोळी लागल्यावर प्राणी बांधावरून खाली कोसळला आणि गुरगुरत झुडपांत शिरला, माणसापासून काही फुटांवरून

गेला.आपलं आच्छादन टाकून तो माणूस दोनशे यार्डांवरच्या आपल्या झोपडीकडे पळाला. शेजारी लगेच जमा झाले आणि त्याची गोष्ट ऐकून त्यांनी निष्कर्ष काढला,की डुकराला गंभीर जखम झाली आहे. हीना आणि कोल्ह्यांसाठी डुक्कर सोडणं वाईट ठरेल, असं त्यांनी ठरवलं, म्हणून कंदील पेटवण्यात आला आणि सहा धाडसी लोकांचं पथक ते भक्ष्य आणण्यासाठी निघालं.मात्र माझ्या एका भाडेकरूनं (जो त्या मोहिमेत सामील होण्यास नकार देत होता आणि ज्याने नंतर कबूल केलं की त्याला काळोख्या झुडपांत जखमी डुकराला शोधायची हिंमत नव्हती)सुचवलं की बंदुकीत गोळ्या भरून ती सोबत न्यावी.

त्याचा सल्ला मान्य करण्यात आला आणि जेव्हा भरपूर दारूगोळा दाबला जात होता, तेव्हा लाकडी दांड अडकून बंदुकीच्या नळीत मोडलं. ही किरकोळ घटना नक्कीच त्या सहाजणांचे जीव वाचवणारी ठरली. मोठ्ठ्या त्रासानं शेवटी मोडलेला दांडा काढण्यात आला, बंदूक भरली गेली आणि पथक निघालं.

दिवशी सकाळी पुन्हा शोध सुरू झाला, आता माझा तो भाडेकरूही सोबत होता—जो बाकींच्यापेक्षा चांगला जंगलातला माहीतगार होता—आणि त्यानं एका झुडपाखाली, जिथे बरंच रक्त होतं, तिथपासून काही रक्ताने माखलेले केस गोळा केले आणि मला आणून दिले. मी ते वाघाचे केस म्हणून ओळखले.

त्या दिवशी माझ्यासोबत दुसरा एक शिकारीही होता, आणि आम्ही दोघं मिळून त्या ठिकाणी गेलो. जंगलातील घटनांची पाऊलखुणांवरून पुनर्रचना करणं मला नेहमीच खूप रंजक वाटलं आहे. खरंय, आपले अंदाज कधी चुकीचे ठरतात, पण ते बऱ्याचदा बरोबरही ठरतात. ह्यावेळी मी उजव्या पुढच्या पायाच्या आतील भागात जखम असल्याचा अंदाज बरोबर लावला होता, पण—

प्राणी झुडपांत शिरलेल्या जागी पोचल्यावर काळजीपूर्वक शोध घेण्यात आला, आणि रक्त सापडल्यानंतर त्या'डुकराला'शोधण्यासाठी पूर्ण प्रयत्न झाले; पण सगळं क्षेत्रझाडूनझाल्यावरहीत्यारात्रीचाशोधसोडूनदेण्यातआला. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा शोध सुरूझाला, आता माझा तो भाडेकरूही सोबत होता—जो बाकीच्यांपेक्षा चांगला जंगलातला होता—आणि त्यानं एका झुडपाखाली, जिथे बरंच रक्त होतं, ते तपासून काही रक्ताने माखलेले केस गोळा केले आणि मला आणून दिले. मी ते वाघाचे केस म्हणून ओळखले.

त्या दिवशी माझ्यासोबत दुसरा एक शिकारीही होता, आणि आम्ही दोघं मिळून त्या ठिकाणी गेलो. जंगलातील घटनांची पाऊलखुणांवरून पुनर्रचना करणं मला नेहमीच खूप रंजक वाटलं आहे. खरंय, आपले अंदाज कधी चुकीचे ठरतात, पण ते बऱ्याचदा बरोबरही ठरतात. ह्यावेळी मी उजव्या पुढच्या पायाच्या आतील मनगटात जखम असल्याचा अंदाज बरोबर लावला होता, पण— सध्याच्या प्रसंगात मी वाघाच्या उजव्या पुढच्या पायाच्या आतील भागात गोळी लागली आहे, हे मी बरोबर ओळखले, पण पाय मोडला आहे आणि वाघ तरुण आहे व या परिसरात नवीन आहे, असे गृहित धरले,त्यामध्ये मी चुकलो.

ज्या ठिकाणी वाघाचे केस सापडले होते, त्यापुढे रक्ताचा काहीही माग नव्हता, आणि कडक जमिनीवर वाघाचा माग काढणे अशक्य असल्यामुळे मी कालवा ओलांडून त्या वाळूच्या पट्ट्यात गेलो जिथे गुरांचा रस्ता जात होता. तिथल्या पावलांच्या ठशांवरून मला कळले की जखमी वाघ हा माझा जुनामित्र, पिपलपाणी वाघच आहे, जो गावातून जवळचा रस्ता घेत असताना अंधारात डुकरासारखा समजला गेला होता.

याआधी एकदा तो गंभीर जखमी असताना देखील,वस्तीमधून कोणालाही इजा न करता, गेला होता. पण आता तो वयस्कर झाला होता, आणि वेदना व भुकेने पछाडल्यास,मोठे नुकसान करू शकला असता. ही कल्पना चिंताजनक होती, कारण हा परिसर दाट लोकवस्तीचा होता आणि मला आठवड्याभरात एका टाळता न येणाऱ्या कार्यक्रमासाठी निघायचे होते.

मी तीन दिवस कालवा आणि डोंगरपायथा या दरम्यानच्या साधारण चार चौरस मैल जंगलात वाघाचा थांगपत्ता न लागता सगळीकडे शोध घेतला.चौथ्या दिवशी दुपारी, मी शोध सुरू ठेवायला निघालो असता, मला एक म्हातारी आणि तिचा मुलगा जंगलातून घाईघाईने बाहेर येताना भेटले.त्यांच्याकडून कळले की वाघ डोंगरपायथ्याजवळ डरकाळ्या फोडत आहे आणि जंगलातील सगळी जनावरे पळून गेली आहेत.

मी जेव्हा रायफल घेऊन बाहेर जातो, तेव्हा नेहमी एकटाच जातो; कारण गोंधळ झाल्यास ते अधिक सुरक्षित असते, आणि आपण जंगलात शांतपणे हालचाल करू शकतो.पण यावेळी मी अपवाद केला आणि मुलाला सोबत येऊ दिले, कारण त्याला वाघ कुठे ऐकला होता, ते मला दाखवण्याची फारच उत्सुकता होती.

डोंगरपायथ्याशी पोचल्यानंतर मुलाने एका दाट झुडपांकडे बोट दाखवले; त्या झुडपाच्या पलीकडे फायर-ट्रॅक होता (ज्याचा मी आधी उल्लेख केला आहे)आणि इथल्या बाजूला पिपलपाणीचा ओढा होता. ओढ्याच्या समांतर आणि सुमारे शंभर यार्डांवर वीस फूट रुंद अशी एक उथळ दरी होती. माझ्या बाजूला ती बरीच मोकळी होती आणि ओढ्याच्या बाजूला झुडपांनी वेढलेली होती. त्या दरीतून एक पायवाट सरळ कोनात ओलांडून जात होती.पायवाटेपासून वीस यार्डांवर, दरीच्या मोकळ्या

बाजूला, एक छोटेसे झाड होते. वाघ जर पायवाटेने खाली आला तर झुडपातून बाहेर पडताना दिसला, तर नक्कीच मला गोळी घालण्याची संधी मिळेल.

मी तिथेच उभे राहण्याचे ठरवले. मुलाला झाडावर चढवले, त्याचे पाय माझ्या डोक्याच्या उंचीवर होते, आणि त्याला सांगितले, की वरच्या जागेवरून त्याला वाघ आधी दिसला तर पाय हलवून मला खूण करावी. मी झाडाला पाठ लावून उभा राहीलो आणि हाका मारू लागलो.

ज्यांनी माझ्यासारखी अनेक वर्षे जंगलात काढली आहेत, त्यांना वाघिणीच्या नरवाघासाठी दिलेल्या हाकांचे वर्णन करण्याची गरज नाही. आणि ज्यांना हा अनुभव नाही त्यांना मी एवढेच सांगू शकतो की हा आवाज शिकण्यासाठी काळजीपूर्वक निरीक्षण आणि गळ्याला गोडवा आणणाऱ्या औषधाचा भरपूर वापर करावा लागतो आणि हा आवाज शब्दांत सांगता येत नाही.

मला फारच दिलासा वाटला, कारण मी तीन दिवस ट्रिगरवर बोट ठेवून जंगलात भटकत होतो आणि लगेचच मला साधारण पाचशे यार्डांवरून उत्तर मिळाले.त्यानंतर अर्धा तासभर– कदाचित कमीच, पण मला जास्तच वाटला– दोन्ही बाजूंनी आवाज येत होते. एका बाजूला जंगलाचा राजा जोरात हाक मारत होता आणि दुसऱ्या बाजूला त्याची राणी अलगद आणि हळुवार उत्तर देत होती.

दोनदा मुलाने खूण केली, पण अजून मला वाघ दिसला नव्हता आणि मग, जेव्हा मावळत्या सूर्याची सोनेरी किरणे जंगलात पसरली, तेव्हा तो वाघ अचानक समोर आला– झुडपातून बाहेर पडताना क्षणभरही न थांबता, जलद पाऊलांनी चालत, थेट खाली उतरत,जवळजवळ अर्धा खळगा ओलांडून गेल्यावर, आणि मी बंदूक उचलणार इतक्यात, तो उजवीकडे वळला आणि सरळ माझ्याकडेच यायला लागला.



माझ्या ठिकाणाची निवड करताना मी याचा अंदाज घेतलेला नव्हता आणि त्यामुळे तो मी ठरवलेल्या अंतरापेक्षा जास्त जवळ येऊ लागला; याशिवाय, आता मला डोक्यावर गोळी घालण्याचीच संधी मिळत होती आणि इतक्या जवळून तशी गोळी झाडायला मी तयार नव्हतो.

जुन्या अनुभवावर आधारलेली आणि पूर्वीही अशाच प्रसंगी यशस्वी ठरलेली एक युक्ती मी वापरली. वाघ थांबला, पण सावध झाला नाही. एका पंजाला हवेत धरून त्याने हळूच आपलं डोकं वर केलं आणि त्याचबरोबर छाती आणि घसा उघडा पडला.

भारी गोळीचा जबरदस्त आघात झाल्यावर तो उठायचा प्रयत्न करू लागला आणि आंधळ्यासारखा जंगलातून धडपडत, पळत सुटला; शेवटी, एका कस्तुरी

हरिणीच्या हाकेला भुलून ज्या ठिकाणी मी त्याचे पाऊलांचे ठसे प्रथम पाहिले होते, त्या ठिकाणाजवळच तो धडामकन कोसळला.

तेव्हाच मला कळलं की त्याच्यावर गोळी झाडणं ही चूक झाली होती, कारण जी जखम त्याला धोकादायक ठरवेल, अशी मला भीती होती, ती तपासल्यावर जवळपास भरून आली होती आणि उजव्या पुढच्या पायाच्या आतील भागातील एका छोट्या शिरेला चुकून लागलेल्या शिशाच्या गोळीमुळे ती झाली होती.दहा फूट तीन इंच लांब, टोकदार हिवाळी केसांनी झाकलेल्या त्या भव्य शिकारीवर हात मिळवल्याचा आनंद, मनातल्या खंतीविना नव्हताच; कारण आता पुन्हा कधीही मी आणि जंगलातले जीव त्याच्या घोगऱ्या आवाजातल्या डरकाळया ऐकणार नव्हतो, आणि गेली पंधरा वर्षे ज्या शिकारीच्या पायवाटांवर तो आणि मी हिंडलो होतो, त्यावर पुन्हा कधीही त्याचे ठसे उमटणार नव्हते.

# ठाक मनुष्यभक्षक

खूप महिन्यांपासून लाध्या खोऱ्यात शांतता नांदत होती; परंतु सप्टेंबर १९३८ मध्ये नैनीतालला अशी बातमी मिळाली की कोट किंड्री या गावात बारा वर्षांची एक मुलगी वाघाच्या हल्ल्यात मारली गेली आहे. वनविभागातील डोनाल्ड स्टुअर्ट यांच्याकडून मला ही माहिती मिळाली; मात्र त्या अहवालात तपशील नव्हते. काही आठवड्यांनी मी गावाला भेट दिली, तेव्हाच या शोकांतिकेची सविस्तर माहिती मला कळू शकली.

असे दिसून आले की एका दिवशी दुपारी, गावाच्या अगदी जवळ—आणि गावाच्या पूर्ण नजरेसमोर—आंब्याच्या झाडाखाली पडलेले आंबे गोळा करत असताना अचानक एक वाघ तिथे आला. जवळच काम करणाऱ्या पुरुषांना काही मदत करता येण्याआधीच त्या वाघाने तिला उचलून नेले. वाघाचा पाठलाग करण्याचा कोणताही प्रयत्न करण्यात आला नाही; आणि मी घटनास्थळी पोचेपर्यंत ओढल्याच्या खुणा व रक्ताचे डाग पूर्णपणे पुसले गेले होते, त्यामुळे वाघाने मृतदेह कुठे नेला होता ते ठिकाण मला सापडू शकले नाही. कोट किंड्री हे गाव चुकापासून सुमारे चार मैल नैऋत्येला, तर ठाकपासून नेमके तीन मैल पश्चिमेला आहे. कोट किंड्री आणि ठाक यांच्या मधल्या खोऱ्यातच मागील एप्रिल महिन्यात चुका येथील नरभक्षक वाघ मारला गेला होता.

१९३८ च्या उन्हाळ्यात वनविभागाने या परिसरातील सर्व झाडे तोडण्यासाठी चिन्हांकित केली होती. नोव्हेंबरपूर्वी—ज्या वेळी जंगलतोड सुरू होणार होती—नरभक्षकाचा बंदोबस्त झाला नाही, तर मजूर मिळणार नाहीत आणि ठेकेदार आपले करार रद्द करतील, अशी भीती होती. याच संदर्भात मुलगी मारली गेल्यानंतर थोड्याच काळात डोनाल्ड स्टुअर्ट यांनी मला पत्र लिहिले होते. त्यांच्या विनंतीला मान देऊन मी कोट किंड्रीला जाण्याचे आश्वासन दिले खरे; पण प्रामाणिकपणे सांगायचे तर ते आश्वासन मी ठेकेदारांच्या हितापेक्षा स्थानिक रहिवाशांच्या हितासाठीच दिले होते.

कोट किंड्रीला जाण्यासाठी माझा सर्वात थेट मार्ग म्हणजे रेल्वेने टणकपूरपर्यंत जाणे आणि तिथून कालढुंगा व चुका मार्गे पायी जाणे. हा मार्ग निवडल्यास शंभर मैलांचे पायी चालणे वाचले असते; पण त्यासाठी मला उत्तर भारतातील अत्यंत प्राणघातक मलेरियाच्या पट्ट्यातून जावे लागले असते. त्यामुळे तो टाळण्यासाठी मी टेकड्यांमधून मोर्नौला येथे जाण्याचा, आणि तिथून सोडून दिलेल्या शेरिंग रस्त्याने कोट किंड्रीच्या वरच्या कड्यावर रस्ता संपतो तिथपर्यंत जाण्याचा निर्णय घेतला.

या दीर्घ पायी प्रवासाची तयारी सुरू असतानाच नैनीतालला आणखी एक बातमी मिळाली—सेम या छोट्या गावात एका व्यक्तीचा वाघाने बळी घेतला होता. हे गाव लाध्या नदीच्या डाव्या काठावर असून चुकापासून सुमारे अर्धा मैल अंतरावर आहे.

या वेळी बळी पडलेली व्यक्ती म्हणजे सेमच्या गावप्रमुखाची वृद्ध आई. दोन टेरेस शेतांच्या मधील एका तीव्र उतारावर झुडपे कापताना या दुर्दैवी स्त्रीचा मृत्यू झाला. पन्नास यार्ड लांबीच्या त्या उताराच्या दूरच्या टोकापासून तिने काम सुरू केले

होते, आणि आपल्या झोपडीपासून अवघ्या एका यार्डवर येईपर्यंत झुडपे कापली होती, तेवढ्यात वरच्या शेतातून वाघाने तिच्यावर झडप घातली.

हल्ला इतका अचानक आणि अनपेक्षित होत की त्या स्त्रीला… ठार मारण्यापूर्वी फक्त एकदाच किंकाळी फोडण्याइतपत वेळ मिळाला. त्यानंतर वाघाने केलेला हल्ला इतका अचानक आणि अनपेक्षित होता की वाघाने तिला उचलून बारा फूट उंच कड्यावर नेले, वरच्या शेतातून पार नेले आणि पुढील दाट जंगलात तिच्यासह नाहीसा झाला.

तिचा मुलगा—सुमारे वीस वर्षांचा तरुण—त्या वेळी काही गजांवरच्या भाताच्या शेतात काम करत होता आणि ही संपूर्ण घटना त्याने पाहिली; पण भीतीमुळे तो काहीही मदत करण्याचा प्रयत्न करू शकला नाही.आपल्या झोपडीपासून अवघ्या एक यार्ड अंतरावर आली असतानाच वरच्या शेतातून वाघाने तिच्यावर झडप घातली. मुलाला त्या महिलेचे कपडे व थोडी हाडे सापडली. खूप उन्हाच्या दिवशी दुपारी दोन वाजता हे घडले. तिच्या झोपडीपासून फक्त साठ यार्डावर वाघाने त्या बाईला ठार केले.

मुलाच्या तातडीच्या बोलावण्यावरून पटवारी दोन दिवसांनी सेमला पोहोचला. त्याच्यासोबत त्याने जमवलेले ऐंशी पुरुष होते. वाघ ज्या दिशेने गेला होता त्या दिशेने शोध घेतला असता, त्या स्त्रीचे कपडे आणि हाडांचे काही छोटे तुकडे आढळले. ही घटना दुपारी दोन वाजता, उजळ सूर्यप्रकाशात घडली होती; आणि वाघाने तिला जिथे मारले होते त्या झोपडीपासून अवघ्या साठ गजांवरच तिचे मांस भक्षण केले होते.

ही दुसरी बातमी मिळताच, अल्मोरा, नैनीताल आणि गढवाल या तीन जिल्ह्यांचे डेप्युटी कमिशनर इबॉटसन आणि आणि मी युद्धपरिषद भरवली. तिचा निष्कर्ष असा निघाला की, तिबेटच्या सीमेवरील आस्कोट येथे जमिनीच्या वादाचा निकाल लावण्यासाठी निघण्याच्या तयारीत असलेले इबॉटसन यांनी आपला दौरा कार्यक्रम बदलावा आणि बागेश्वरमार्गे जाण्याऐवजी माझ्याबरोबर सेमपर्यंत यावे, व तेथून पुढे आस्कोटला जावे.

मी युद्धपरिषद घेतली. त्याचा निष्कर्ष असा निघाला की, तिबेटच्या सीमेजवळील आस्कोट येथे जमीनविवाद निकाली मी निवडलेला मार्ग बराचसा चढउताराचा असल्याने, अखेरीस आम्ही नंदौर खोऱ्यातून जाण्याचा, नंदौर आणि लाध्या यांमधील जलविभाजक ओलांडण्याचा आणि मग लाध्या नदीच्या प्रवाहाबरोबर खाली उतरून सेमला पोचण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार इबॉटसन कुटुंब १२ ऑक्टोबरला नैनीतालहून निघाले, आणि दुसऱ्या दिवशी मी चौर्गल्लिया येथे त्यांना येऊन मिळालो.

नंदौर खोऱ्यातून वर चढताना आम्ही मासेमारीही करत होतो—हलक्या ट्राउट काठीवर एका दिवसात आमची सर्वात मोठी पकड १२० मासे इतकी झाला—आणि पाचव्या दिवशी आम्ही दुर्गा पेपळ येथे पोहोचलो. येथे आम्ही नदी सोडली, आणि अत्यंत कठीण चढणीनंतर त्या रात्री जलविभाजकावर मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी पहाटेच निघून, त्या रात्री आम्ही चालतीपासून बारा मैल अंतरावर लाध्या नदीच्या डाव्या तीरावर तंबू ठोकले.

पावसाळा लवकरच ओसरला होता, हे आमच्यासाठी फारच भाग्याचे ठरले; कारण खोऱ्यात थेट खाली उतरणाऱ्या उंच कड्यांमुळे नदी दर पाव मैलाला एकदा

तरी ओलांडावी लागत होती. अशाच एका उतारावर माझा स्वयंपाकी—जो बूट घातल्यावर पाच फूट उंच आहे—पाण्यात वाहून गेला असता; पण आमच्या दुपारच्या जेवणाची टोपली वाहणाऱ्या माणसाने वेळीच मदत केल्यामुळे तो पाण्यातील मृत्यूपासून वाचला.

चौर्गल्लिया सोडल्यानंतर दहाव्या दिवशी आम्ही सेम येथे एका ओसाड शेतात तळ ठोकला. हे ठिकाण त्या स्त्रीचा मृत्यू झालेल्या झोपडीपासून दोनशे गजांवर आणि लाध्या व शारदा नद्यांच्या संगमापासून शंभर गजांवर होते.

लाध्या नदीकाठाने खाली उतरताना आमची भेट पोलिस खात्यातील गिल वॅडेल यांच्याशी झाली. ते काही दिवस सेममध्ये तळ ठोकून होते आणि वनविभागातील मॅकडोनाल्ड यांनी सौजन्याने आमच्या उपयोगासाठी दिलेला एक नर म्हैस त्यांनी बांधून ठेवला होता. वॅडेल सेममध्ये असताना वाघ अनेकदा तेथे येऊन गेला होता; पण त्याने त्या नर म्हशीला मारले नव्हते.

सेमला पोचल्यानंतर दुसऱ्या दिवशी, इबॉटसन,आजूबाजूच्या गावांचे पटवारी, वनरक्षक आणि गावप्रमुख यांची चौकशी करत असताना, मी वाघाच्या पाऊलांच्या खुणा शोधण्यासाठी बाहेर पडलो. आमच्या छावणी आणि संगम यांच्यामधील तसेच लाध्या नदीच्या दोन्ही काठांवर वाळूचे लांब पट्टे होते. या वाळूवर मला एका वाघिणीच्या आणि एका तरुण नर वाघाच्या—कदाचित एप्रिलमध्ये मी पाहिलेल्या पिल्लांपैकीच एखाद्याच्या—खुणा सापडल्या. मागील काही दिवसांत त्या वाघिणीने अनेकदा लाध्या नदी ओलांडली होती, आणि मागील रात्री ती आमच्या तंबूसमोरच्या वाळूच्या पट्ट्यावरून चालत गेली होती.

हीच वाघीण नरभक्षक असल्याचा गावकऱ्यांचा संशय होता; आणि गावप्रमुखाच्या आईच्या मृत्यूनंतर ती वारंवार सेममध्ये येत असल्याने त्यांचा अंदाज बहुधा बरोबरच होता.

वाघिणीच्या पाऊलांच्या खुणांची तपासणी केली असता, ती मध्यम आकाराची, आणि आयुष्याच्या उत्तम टप्प्यातील असल्याचे दिसून आले. ती नरभक्षक का बनली होती, हे पुढे ठरवावे लागणार होते; पण एक शक्यता अशी होती की मागील संयोगकाळात चुका येथील वाघासोबत असताना तिने त्याच्या बळींचे मांस खाण्यात सहभाग घेतला असावा, आणि त्यामुळे तिला मानवी मांसाची चटक लागली असावी. आता जोडीदार नसल्याने तो पुरवठा थांबल्यावर तिने स्वतःच नरभक्षक बनण्याचा मार्ग धरला असावा. हा केवळ अंदाज होता आणि नंतर तो चुकीचा ठरला.

नैनीतालहून निघण्यापूर्वी मी टणकपूरच्या तहसीलदारांना पत्र लिहून माझ्यासाठी चार तरुण नर म्हशी विकत घेण्यास सांगितले होते आणि त्या सेमला पाठवण्याची विनंती केली होती. त्यांपैकी एक म्हैस वाटेतच मरण पावली; उरलेल्या तीन २४ तारखेला पोचल्या, आणि त्याच संध्याकाळी मॅकडोनाल्ड यांनी दिलेल्या म्हशीसह आम्ही त्या सर्वांना बांधून ठेवले. दुसऱ्या दिवशी सकाळी या जनावरांना पाहण्यासाठी बाहेर गेलो असता, चुका गावातील लोक प्रचंड अस्वस्थ व उत्तेजित अवस्थेत असल्याचे मला आढळले. गावाभोवतालची शेते अलीकडेच नांगरलेली होती, आणि मागील रात्री वाघीण तीन कुटुंबांच्या अगदी जवळून गेली होती—ही कुटुंबे आपल्या गुरांसह शेतातच झोपली होती. सुदैवाने प्रत्येक वेळी गुरांनी वाघीण पाहून झोपलेल्यांना तिच्या येण्याची जाणीव करून दिली होती. लागवडीची जमीन

मागे टाकल्यानंतर वाघीण कोट किंड्रीच्या दिशेने जाणाऱ्या पायवाटेवर चढली, आणि आमच्या दोन म्हशींच्या अगदी जवळून गेली; पण त्यांपैकी कोणालाही तिने हात लावला नाही.

सेमला पोचताच पटवारी, वनरक्षक आणि गावकऱ्यांनी आम्हाला सांगितले होते की तरुण म्हशी बांधून ठेवणे म्हणजे वेळ वाया घालवण्यासारखे आहे, कारण त्यांचा ठाम विश्वास होता की नरभक्षक त्यांना मारणार नाही. त्यांनी दिलेले कारण असे की, नरभक्षकाला गोळी घालण्यासाठी ही पद्धत इतरांनीही वापरून पाहिली होती, पण यश आले नव्हते; शिवाय वाघीण जर म्हशी खाण्याच्या विचारात असती तर जंगलात चरणाऱ्या अनेक म्हशी तिला सहज उपलब्ध होत्या. या सल्ल्याकडे दुर्लक्ष करूनसुद्धा आम्ही म्हशी बांधून ठेवतच राहीलो, आणि पुढील दोन रात्री वाघीण त्यांपैकी एक-दोन म्हशींच्या अगदी जवळून गेली, तरीही तिने त्यांना स्पर्शही केला नाही.

२७ तारखेला सकाळी, आम्ही नाश्ता आटोपत असतानाच ठाकच्या गावप्रमुखाचा भाऊ तेवारी यांच्या नेतृत्वाखाली काही पुरुष छावणीत आले आणि त्यांनी कळवले की त्यांच्या गावातील एक माणूस बेपत्ता आहे. त्यांनी सांगितले की हा माणूस आदल्या दिवशी दुपारच्या सुमारास घरातून निघताना आपल्या पत्नीला असे सांगून गेला होता की गुरे गावाच्या हद्दीपलीकडे भरकटू नयेत याची तो खबरदारी घेणार आहे. तो परत न आल्यामुळे, नरभक्षकाने त्याला ठार केले असावे अशी त्यांना भीती वाटत होती.

आमची तयारी लगेचच पूर्ण झाली, आणि दहा वाजता इबॉटसन, मी, तेवारी आणि त्याच्यासोबत आलेले पुरुष ठाककडे निघालो. अंतर जेमतेम दोन मैलांचे

होते, पण चढ बराच कठीण होता; आणि शक्य तितका वेळ वाचवायचा असल्याने, आम्ही अक्षरशः धापा टाकत, घामाने पूर्ण भिजलेल्या अवस्थेत गावाच्या कडेला पोचलो.

गावाजवळ पोचताना—झुडपांनी आच्छादलेल्या सपाट जमिनीवरून, ज्याचा उल्लेख मला पुढे करावा लागणार आहे—आम्हाला एका स्त्रीचे रडणे ऐकू आले. मृतासाठी शोक करणाऱ्या भारतीय स्त्रीचा आक्रोश सहज ओळखू येतो; आणि जंगलातून बाहेर पडताच आम्हाला ती शोकाकुल स्त्री—म्हणजे बेपत्ता माणसाची पत्नी—आणि दहा-पंधरा पुरुष लागवडीच्या जमिनीच्या काठावर आमची वाट पाहत उभे दिसले. त्यांनी आम्हाला सांगितले की वरच्या घरांतून त्यांना शेतात, झुडपांनी भरलेल्या एका माळरानात, आम्ही जिथे उभे होतो तिथून सुमारे तीस गजांवर, पांढरी वस्तू दिसली होती—जी त्या बेपत्ता माणसाच्या कपड्यांचा भाग असावा असे वाटत होते.

इबॉटसन, तेवारी आणि मी त्या पांढऱ्या वस्तूची पाहणी करण्यासाठी निघालो, तर श्रीमती इबॉटसन त्या स्त्रीला आणि उरलेल्या पुरुषांना गावाकडे घेऊन गेला.

ते शेत काही वर्षांपासून लागवडीखाली नव्हते, आणि त्यावर क्रायसँथेममसारख्या दिसणाऱ्या दाट झुडपांची वाढ झाली होती. त्या पांढऱ्या वस्तूवर अक्षरशः उभे राहिल्यावरच तेवारीला ती बेपत्ता माणसाचे कटीवस्त्र (लंगोट) असल्याचे ओळखता आले. जवळच त्या माणसाची टोपीही होती. त्या ठिकाणी झटापट झाल्याचे स्पष्ट दिसत होते; पण रक्ताचा एकही डाग नव्हता. हल्ला झालेल्या ठिकाणी आणि ओढत नेलेल्या मार्गावर बराच अंतरापर्यंत रक्त न दिसण्याचे कारण

असे असू शकते की वाघिणीने पहिली पकड कायम ठेवली. होती; अशा वेळी पकड बदलली जात नाही तोपर्यंत रक्त वाहत नाही.

आमच्या वरच्या बाजूला टेकडीवर सुमारे तीस गजांवर, झुडपांचा एक दाट पुंजका होता, ज्यावर छपरासारखे आच्छादन झालेले होते…

आमच्या वरच्या बाजूला टेकडीवर सुमारे तीस गजांवर वेलींचे छप्पर जणू तयार झालेले असे झुडपांचे एक दाट बेट होते. ओढत नेलेल्या खुणांचा पाठलाग सुरू करण्यापूर्वी हे ठिकाण तपासणे आवश्यक होते, कारण वाघीण आपल्यामागे राहणे शहाणपणाचे नव्हते. त्या झुडपांखालील मऊ माती मध्ये आम्हाला वाघिणीच्या पाऊलांच्या खुणा आढळल्या, तसेच माणसावर हल्ला करण्यापूर्वी ती जिथे आडवी पडून होती, ते ठिकाणही दिसून आले.

आमच्या सुरुवातीच्या ठिकाणी परत येऊन आम्ही पुढील कृतीचा आराखडा ठरवला. आमचा मुख्य उद्देश वाघिणीचा पाठलाग करून तिला तिच्या बळीवर असतानाच दबा धरून गोळी घालण्याचा होता. हे साध्य करण्यासाठी मी खुणांचा माग काढत पुढे जाणार होतो आणि समोर लक्ष ठेवणार होतो; नि:शस्त्र असलेला तेवारी माझ्या मागे एक गजावर राहून उजवी-डावी बाजू बारकाईने पाहणार होता; तर तेवारीच्या मागे एक गजावर इबॉटसन राहून मागून होणाऱ्या संभाव्य हल्ल्यापासून आमचे संरक्षण करणार होते. इबॉटसनला किंवा मला वाघिणीचा एखादाही केस जरी दिसला, तरीही गोळी झाडण्याचा धोका पत्करायचा, असे ठरले.

आदल्या दिवशी या भागात गुरे चरली होती, त्यामुळे जमीन विस्कटलेली होती; रक्ताचा मागही नव्हता. वाघिणीच्या वाटचालीचा एकमेव संकेत म्हणजे एखादे उलटलेले पान किंवा तुडवलेली गवताची पात—म्हणून आमची प्रगती अत्यंत संथ

होती. माणसाला सुमारे दोनशे गज वाहून नेल्यानंतर वाघिणीने त्याला ठार केले होते आणि तिथेच सोडून दिले होते. काही तासांनी—ठाक गावातील लोकांना या दिशेने सांबरांच्या हाका ऐकू आल्या. त्या वेळी—ती परत आली आणि त्याला पुन्हा उचलून नेले. वाघिणीने माणसाला मारल्यानंतर तिथून लगेच न नेण्याचे कारण बहुधा असे असावे की गुरांनी हल्ला पाहिला होता आणि तिला हुसकावून लावले होते. जिथे तो माणूस पडून होता तिथे रक्ताचा मोठा डोह साचला होता; पण नंतर वाघिणीने त्याला पुन्हा उचलले तेव्हा त्याच्या घशातील जखमेतून रक्त वाहणे थांबले होते. शिवाय, यावेळी ती त्याला मानेऐवजी कमरेखालच्या भागातून पकडून नेत होती. त्यामुळे माग काढणे आणखीनच कठीण झाले. वाघीण टेकडीच्या कडेकडूनच चालत होती; इथे दाट झुडपे असल्यामुळे आणि दृष्टी फक्त काही गजांपुरतीच मर्यादित असल्याने आमची वाटचाल आणखी मंदावली. दोन तासांत आम्ही अवघा अर्धा मैल अंतर कापले आणि त्या कड्यावर पोहोचलो, ज्याच्या पलीकडे सहा महिन्यांपूर्वी आम्ही चुका येथील नरभक्षकाचा माग काढून त्याला ठार केले होते, ते खोरे होते.

त्या कड्यावर एक मोठा दगडी फरशीसारखा कडा होता, जो आम्ही आलो त्या दिशेच्या उलट बाजूला वरच्या दिशेने झुकलेला होता. वाघिणीच्या खुणा त्या दगडाच्या उजव्या बाजूने खाली जात होत्या, आणि मला खात्री वाटत होती की ती त्या बाहेर आलेल्या दगडाखाली, किंवा त्याच्या अगदी आसपास आडवी पडून आहे.

इबॉटसन आणि माझ्या पायात हलक्या रबरतळाच्या चपला होत्या—तेवारी नुसता पायाने होता—आणि आम्ही कोणताही आवाज न करता त्या दगडापर्यंत

पोहोचलो होतो. माझ्या दोन्ही साथीदारांना हाताच्या खुणेने थांबायला व आजूबाजूला सावध नजर ठेवायला सांगून, मी त्या दगडावर पाय रोवला आणि इंचागणिक पुढे सरकत गेलो. दगडाच्या पलीकडे थोडीशी सपाट जमीन होती; आणि तिचा अधिकाधिक भाग दिसू लागल्यावर, वाघीण त्या बाहेर आलेल्या कड्याखालीच आडवी पडली आहे, हा माझा अंदाज बरोबर असल्याची मला खात्री वाटू लागली.

मी अजून एक-दोन फूट पुढे गेलो असतो, इतक्यात मला डाव्या पुढील बाजूस हालचाल जाणवली. दाबून पडलेली एक सोनकाडी (गोल्डन-रॉड) सरळ उभी राहिली; आणि क्षणभरातच पुढील झुडपांत थोडीशी हालचाल झाली. त्या झुडपांच्या पलीकडील झाडावर बसलेले एक माकड आवाज करू लागले .

वाघिणीने जेवणानंतरच्या विश्रांतीसाठी जागा अतिशय काळजीपूर्वक निवडली होती; पण दुर्दैवाने आमच्यासाठी ती झोपलेली नव्हती. मी टोपी काढली होती, आणि दगडावरून माझ्या डोक्याचा वरचा भाग दिसताच ती उठली; बाजूला एक पाऊल टाकून तिने काटेरी ब्लॅकबेरीच्या झुडपांतून नाहीशी होण्याचा मार्ग धरला. ती जिथे होती त्याखेरीज इतर कुठे असती, तर कितीही वेगाने हालचाल केली असती तरी माझ्या गोळीशिवाय ती सुटू शकली नसती. अत्यंत काळजीपूर्वक आखलेला आमचा दबा शेवटच्या क्षणी फसला; आणि आता करण्यास उरले होते ते फक्त बळी शोधणे आणि त्यात आमच्यासाठी बसून दबा धरता येईल इतके काही शिल्लक आहे का, ते पाहणे.

तिला ब्लॅकबेरीच्या काटेरी झुडपांतून पाठलाग करणे व्यर्थ ठरले असते; शिवाय पुढे कधी तरी तिला गोळी झाडण्याची आमची संधीही त्यामुळे कमी झाली असती.

वाघीण जिथे आडवी पडली होती, त्याच्याजवळच तिने आपले जेवण केले होते; पण हे ठिकाण आकाशाकडे खुले असल्याने आणि गिधाडांच्या तीक्ष्ण नजरेस सहज पडू शकत असल्याने, तिने तो बळी हवेतून दिसणार नाही अशा सुरक्षित जागी ओढून नेला होता. आता माग काढणे सोपे झाले होते, कारण रक्ताचा माग स्पष्ट दिसत होता. हा माग मोठमोठ्या दगडांच्या एका कड्यावरून गेला होता; आणि त्या दगडां पलीकडे सुमारे पन्नास गजांवर आम्हाला बळी सापडला.

त्या गरीब, फाटलेल्या-तुटलेल्या देहाचे वर्णन करून तुमच्या भावना विदीर्ण करायचा माझा विचार नाही. काही तासांपूर्वी जो माणूस होता—दोन मुलांचा पिता आणि शोकाकुल स्त्रीचा कर्ता पुरुष—तो आता कपड्यांचा एकही तुकडा वा मानवी प्रतिष्ठेचा अणुमात्रही उरलेला नसलेला, विदीर्ण मांसाचा ढीग बनला होता. त्या स्त्रीसमोर—कुठल्याही भ्रमांशिवाय—भारतीय विधवेचे अपरिहार्य भविष्य उभे होते. नरभक्षकांचा पाठलाग करताना गेल्या बत्तीस वर्षांत मी अशी अनेक दृश्ये पाहिली आहेत; प्रत्येक दृष्य आधीच्या दृष्यापेक्षा अधिक भयावह होते. आणि प्रत्येक वेळी मला असे वाटले आहे, की पीडिताला मारणाऱ्याच्या हवालीच सोडले असते, तर कदाचित अधिक बरे झाले असते; कारण परत मिळवलेला हा विदीर्ण देह पाहणाऱ्यांसाठी आयुष्यभरचे दुःस्वप्न ठरतो.

दुसरा कोणताही भयानक धोका नाही अशा आपत्तीपासून एखादा प्रदेश मुक्त करण्याची ज्वलंत इच्छा, यांना कोणीही विरोध करू शकत नाही. आणि कितीही

हास्यास्पद वाटले, तरीही कुठेतरी मनात ही आशा असतेच की कदाचित एखाद्या चमत्काराने बळी अजून जिवंत असेल आणि त्याला मदतीची गरज असेल.

एखाद्या प्राण्याला—जो बहुधा बळीवरच लागलेल्या जखमे मुळे नरभक्षक बनलेला असतो—बळीवर असतानाच गोळी घालण्याची शक्यता फारच कमी असते; आणि प्रत्येक अपयश, त्याचे कारण काहीही असो, त्या प्राण्याला अधिकच सावध बनवत जाते. शेवटी तो अशा अवस्थेला पोहोचतो की तो एकच वेळ जेवून बळी सोडून देतो, किंवा सावलीसारखा, प्रत्येक पान, प्रत्येक काडी तपासत—आपला संभाव्य वधकर्ता शोधण्याच्या खात्रीने, अतिशय हळू आणि नि:शब्दपणे बळीच्या दिशेने सरकतो. तो प्राणी एकदा जेवण करून बळी तिथेच सोडून देतो, किंवा सावलीसारखा—अतिशय हळू आणि नि:शब्दपणे—त्याच्याकडे सरकतो; प्रत्येक पान, प्रत्येक काडी तपासत, कितीही काळजीपूर्वक लपलेला किंवा कितीही शांत व स्थिर असलेला असो, तरीही आपला संभाव्य वधकर्ता शोधून काढण्याच्या खात्रीने. गोळी झाडण्याची संधी दहा लाखांत एक अशी असते; तरीही आपल्यात असा कोण आहे, की जो ती संधी पत्करणार नाही?

ज्या झुडपांत वाघीण माघार घेऊन गेली होती, ते क्षेत्र साधारण चाळीस गज चौकोनी होते, आणि माकड तिला पाहून आम्हाला सावध केल्याशिवाय ती तिथून बाहेर पडू शकणार नव्हते. त्यामुळे पुढची चाल ठरवत असताना जंगलाकडून आणखी काही संकेत मिळतात का ते ऐकण्या साठी, एक सिगारेट ओढत, आम्ही पाठोपाठ पाठ लावून बसलो.

मचाण बांधण्यासाठी गावात परत जाणे आवश्यक होते; पण आमच्या अनुपस्थितीत वाघीण जवळजवळ नक्कीच बळी उचलून गेली असती. पूर्ण माणूस

उचलून नेताना तिचा माग काढणे आधीच कठीण होते; आता तर ओझे बरेच हलके झाले होते आणि तिला व्यत्ययही आला होता—ती कदाचित मैलोनमैल जाईल आणि आम्हाला पुन्हा बळी सापडेलच याची खात्री नव्हती. म्हणून आमच्यापैकी एकाने तिथेच थांबणे आवश्यक होते, तर उरलेले दोघे दोर आणण्यासाठी गावात जाणार होते.

धोक्याची नेहमीप्रमाणे फारशी पर्वा न करणारे इबॉटसन परत जाण्यास तयार झाले. तो आणि तेवारी अलीकडेच आम्ही आलेल्या कठीण उताराला टाळून टेकडी उतरू लागले, आणि मी बळीच्या अगदी जवळ असलेल्या एका छोट्या झाडावर चढलो. जमिनीपासून चार फूट उंचीवर झाड दोन फांद्यांत फुटलेले होते; एका फांदीवर टेकून आणि पाय दुसरीकडे रोवून मी कसाबसा तोल सावरला. ही बैठक धोकादायक होती, पण इतकी उंच होती की वाघीण बळीच्या दिशेने आली तर मला ती दिसली असती; आणि तिला माझ्याबाबत काही हेतू असतील, तर ती झडप घालण्याच्या अंतरात येण्यापूर्वीच मला दिसली असती.

इब्बॉटसन पंधरा–वीस मिनिटे दूर असतानाच मला एक दगड पुढे झुकून पुन्हा मागे सरकण्याचा आवाज ऐकू आला. तो दगड अतिशय नाजूक समतोलात असावा; वाघिणीने त्यावर वजन टाकताच तो पुढे झुकला, हे जाणवताच तिने पाय काढून घेतला आणि दगड पुन्हा जागेवर बसला. हा आवाज माझ्या डाव्या पुढील बाजूस सुमारे वीस गजांवरून आला होता—त्या दिशेनेच मी झाडावरून ढकलला न जाता गोळी झाडू शकलो असतो.

मिनिटांमागून मिनिटे जात राहिली; प्रत्येक मिनिट माझ्या उंचावलेल्या आशांना थोडेथोडे खाली खेचत होती. मज्जातंतूंवरील ताण आणि जड रायफलचे

ओझे असह्य होऊ लागले, तेवढ्यात झुडपांच्या वरच्या टोकाकडून काडी तुटण्याचा आवाज आला. वाघ जंगलात कसा हालचाल करतो याचे हे जिवंत उदाहरण होते. तिने केलेल्या आवाजा वरून मला तिची अचूक जागा कळली होती; माझी नजर तिथेच रोखलेली होती; तरीही ती आली, मला पाहिले, काही काळ मला न्याहाळत थांबली, आणि मग एकही पान किंवा गवताची पात हलताना न दिसता निघून गेली.

मज्जातंतूंवरील ताण अचानक सैल झाला की आखडलेले, दुखरे स्नायू आरामासाठी आर्त हाक देतात. या वेळी त्याचा अर्थ एवढाच होता की खांदे व हातांवरील ताण कमी करण्यासाठी रायफल गुडघ्यांवर टेकवली. हालचाल कितीही लहान असली तरी तिच्यामुळे संपूर्ण शरीरात दिलास्याची लहर पसरली. वाघिणीकडून पुढे कोणताही आवाज आला नाही; आणि तास-दोन तासांनी मला इबॉटसन परत येताना ऐकू आला.

शिकार सफरीत मी ज्यांच्यासोबत गेलो आहे, त्यांत इब्बॉटसन सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्यात सिंहाचे धैर्य तर आहेच, पण तो प्रत्येक गोष्टीचा विचार करतो; आणि त्यासोबतच बंदूक बाळगणाऱ्यांमध्ये तो सर्वात निःस्वार्थ माणूस आहे. तो दोर आणायला गेला होता, आणि परत आला तेव्हा गालिचे, उशा, माझ्याही क्षमतेपेक्षा जास्त गरम चहा, आणि भरपूर जेवण घेऊन आला. मी—बळीच्या वाऱ्याच्या विरुद्ध बाजूला बसून—थोडा दम खात असताना, इबॉटसनने वाघिणीचे लक्ष विचलित करण्यासाठी चाळीस गजांवर एका माणसाला झाडावर बसवले, आणि बळीवर नजर ठेवणारा दोरीचा मचाण तयार करण्यासाठी स्वतः झाडावर चढला. मचाण तयार झाल्यावर इबॉटसनने बळी काही फूट हलवला—अतिशय अप्रिय काम—आणि

वाघीण तो उचलून नेऊ नये म्हणून तो एका तरुण झाडाच्या पायाशी, पुढील काळा साठी… घट्ट बांधून ठेवला.

माझ्याही क्षमतेपेक्षा पिण्यासाठी जास्त पाणी आणि भरपूर जेवण तो घेऊन आला. आणि मी बळीच्या वाऱ्याच्या विरुद्ध बाजूला बसलो असताना— कारण चंद्र मावळतीला आला होता आणि या दाट झाडीच्या ठिकाणी रात्रीचे पहिले दोन तास पूर्णपणे घोर अंधारात जाणार होते; वाघीण तो उचलून नेऊ नये म्हणून ही खबरदारी आवश्यक होती. शेवटची सिगारेट ओढून मी मचाणावर चढलो, आणि आरामात बसल्यावर इबॉटसनने लक्ष विचलित करण्यासाठी झाडावर चढवलेला माणूस खाली उतरवला आणि मिसेस इबॉटसनना घेण्यासाठी ठाकच्या दिशेने निघून, सेम येथील छावणीकडे परत गेला.

माघारी जाणारी मंडळी नजरेआड झाली होती, पण अजून कानाआड झाली नव्हती, तेवढ्यात पानांतून एखादे जड

शरीर घसपटत जाण्याचा आवाज मला ऐकू आला; आणि त्याच क्षणी, आत्तापर्यंत शांत असलेले माकड—जे आता मला काटेरी झुडपांच्या पलीकडील झाडावर बसलेले दिसत होते —ते ओरडू लागले. ही अपेक्षेपेक्षा अधिकच भाग्याची गोष्ट होती, आणि लक्ष विचलित करण्यासाठी झाडावर माणूस बसवण्याची आमची युक्ती, आधीच्या प्रसंगाप्रमाणेच, यशस्वी ठरत असल्याचे दिसत होते.

एक तणावपूर्ण मिनिट गेले, मग दुसरे, तिसरे; आणि मग ज्या कड्यावरून मी मोठ्या दगडी पाटावर चढलो होतो, तिथून एक काकर वेड्यासारखा भुंकत माझ्या दिशेने धावत आला. वाघीण मृतदेहाकडे येत नव्हती; ती इबॉटसनच्या मागे गेली

होती. मला आता असह्य चिंतेची लाट आली, कारण हे स्पष्ट होते की तिने आपली शिकार सोडून दुसरा बळी मिळवण्या चा प्रयत्न सुरू केला होता.

निघण्यापूर्वी इबॉटसनने सर्व काळजी घेण्याचे वचन दिले होते; पण कड्याच्या माझ्या बाजूला काकर भुंकताना ऐकून तो स्वाभाविकच समजेल की वाघीण मृतदेहाच्या आसपासच फिरत आहे, आणि जर त्याने खबरदारी सैल केली तर वाघिणीला संधी मिळेल. माझ्यासाठी दहा अतिशय अस्वस्थ मिनिटे गेली; आणि मग ठाकच्या दिशेकडून दुसरा काकर भुंकताना ऐकू आला—वाघीण अजूनही पाठलाग करत होती, पण तिकडचा भूभाग अधिक मोकळा असल्याने तिथे हल्ल्याची भीती कमी होती.

तरीही इबॉटसन कुटुंबावरील धोका अजूनही संपलेला नव्हता; छावणी गाठण्यासाठी त्यांना दोन मैलांचा अतिशय दाट जंगलातून प्रवास करावा लागणार होता. आणि जर ते माझ्या गोळीच्या आवाजाची वाट पाहत सूर्यास्तापर्यंत ठाक येथे थांबले—जशी मला भीती होती -- आणि प्रत्यक्षात तसेच त्यांनी केले—तर उतरताना त्यांना फार मोठा धोका पत्करावा लागला असता. सुदैवाने इबॉटसनने हा धोका ओळखला आणि आपली मंडळी एकत्र ठेवली; वाघीण संपूर्ण मार्गावर त्यांच्या मागेच होती—दुसऱ्या दिवशी सकाळी दिसलेल्या तिच्या पगमार्क्सवरून हे स्पष्ट झाले—तरीही ते सुरक्षितपणे छावणीत पोचले.

काकर आणि सांबर यांच्या हाका मला वाघिणीच्या हालचालींचा मागोवा घेण्यास मदत करत होत्या. सूर्यास्तानंतर एक तासाने ती दोन मैल दूर दरीच्या तळाशी उतरली होती. संपूर्ण रात्र तिच्या पुढे होती; आणि जरी तिचे मृतदेहाकडे परतणे दशलक्षात एकदाच शक्य असले, तरी ती संधी गमावू नये असे मी ठरवले.

कडाक्याची थंडी असल्याने मी स्वतःभोवती चादर गुंडाळली आणि अनेक तास हालचाल न करता राहू शकेन अशा स्थितीत बसून राहिलो.

दुपारी चार वाजता मी मचाणावर बसलो होतो, आणि रात्री दहा वाजता टेकडीवरून दोन प्राणी माझ्या दिशेने येताना मला ऐकू आले. झाडांच्या आड इतका अंधार होता की ते दिसत नव्हते; पण ते मृतदेहाच्या आडवाऱ्याला आले तेव्हा मला कळले की ते साळिंदर होते. काटे खडखडवत आणि फक्त साळिंदरच करू शकतो असा विचित्र घुमणारा आवाज काढत, ते मृतदेहाजवळ आले; त्याभोवती काही वेळा फेर फटका मारून मग पुढे निघून गेले. एक तासानंतर, आणि चंद्र काही वेळ आकाशात आल्यानंतर, खाली दरीत एक प्राणी हालचाल करत असल्याचा आवाज मला ऐकू आला. तो पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकत होता; आणि जेव्हा तो मृतदेहा कडून खाली उतरणाऱ्या वाऱ्याच्या झोतात आला, तेव्हा तो बराच वेळ थांबला, आणि मग सावधपणे टेकडी चढू लागला. तो अजून बराच दूर असतानाच मला तो हवा हुंगत असल्या चा आवाज ऐकू आला, आणि तो अस्वल आहे हे मला कळले. रक्ताचा वास त्याला आकर्षित करत होता; पण त्या वासात माणसाचा नकोसा वासही मिसळलेला होता. म्हणून कोणतीही जोखीम न पत्करता तो अत्यंत सावधपणे मृतदेहा कडे दबकत येत होता. जंगलातील कोणत्याही प्राण्यांपेक्षा अधिक तीक्ष्ण असलेल्या त्याच्या नाकाने, तो दरीत असताना च, हा मृतदेह वाघाचा आहे हे ओळखले होते. हिमालयीन अस्वल—ज्याला कोणाचीही भीती नसते, आणि ज्याने, मी अनेक वेळा पाहिल्याप्रमाणे, वाघालाही त्याच्या शिकारी पासून पळवून लावले आहे—त्याच्यासाठी हे अडथळा ठरणारे नव्हते; पण रक्त व वाघाच्या वासाबरोबर मिसळले ला माणसाचा वास मात्र त्याला अस्वस्थ करत होता. सपाट जमिनीवर येताच अस्वल मृतदेहापासून काही यार्ड अंतरावर आपल्या मागच्या

पायांवर बसले; आणि त्या तिरस्कारास्पद माणसाच्या वासामुळे आपल्याला काही धोका नाही, याची खात्री करून घेतल्यावर ते ताठ उभे राहिले आणि मान वळवून एक दीर्घ, घुमणारी हाक दिली—जी मी त्याच्या जोडीदाराला दिलेली हाक म्हणून समजली—आणि ती दरीत दूरवर घुमत गेली. त्यानंतर कोणतीही कुचराई न करता ते निर्धास्तपणे मृतदेहाकडे गेले; आणि ते तो हुंगत असतानाच मी माझ्या रायफलची नेमबाजी त्याच्या खांद्यावर स्थिर केली.

हिमालयीन अस्वलाने माणसाचे मांस खाल्ल्याची मला केवळ एकच घटना माहीत आहे; त्या वेळी गवत कापणारी एक स्त्री कड्यावरून पडून मरण पावली होती, आणि अस्वलाने तो विदीर्ण मृतदेह सापडल्यावर उचलून नेऊन खाल्ला होता. पण माझ्या रायफलचा नेम ज्या अस्वलाच्या खांद्यावर स्थिर होता, त्या अस्वलाने मात्र माणसाच्या मांसापाशी सीमा आखली असल्याचे दिसले; मृतदेह पाहून व हुंगून झाल्यावर ते पश्चिमेकडे आपला अर्धवट राहिलेला मार्ग पुन्हा धरून निघून गेले. त्याच्या निघून जाण्याचे आवाज दूरवर विरताच जंगल पुन्हा शांत झाले—सकाळी सूर्योदया नंतर थोड्याच वेळात इबॉटसनच्या अतिशय स्वागतार्ह आगमनाने ती शांतता भंग पावली.

इबॉटसनसोबत मृत व्यक्तीचा भाऊ आणि इतर नातेवाईक आले होते. त्यांनी अत्यंत श्रद्धेने अवशेष स्वच्छ पांढऱ्या कापडात गुंडाळले; इबॉटसनने दिलेल्या दोन कोवळ्या झाडांच्या दांड्या आणि दोरीने बनवलेल्या पालखीसारख्या आडव्या फळीवर ते ठेवले; आणि सरदाच्या काठी असलेल्या स्मशान घाटाकडे निघाले. चालताना ते हळूच हिंदू स्तुतीगीत 'राम नाम सत्य आहे' म्हणत होते, त्याच्या प्रत्ययासह—'सत्य बोल गत आहे'.

थंडीत गेलेले चौदा तास माझ्यावर परिणाम न करता राहिले नाहीत; पण इबॉटसन आणलेल्या गरम पेय आणि अन्नानंतर, माझ्या दीर्घ पहाऱ्याचे काहीच दुष्परिणाम मला जाणवले नाहीत.

## भाग दोन

२७ तारखेला संध्याकाळी इबॉटसन कुटुंबाच्या मागे चुकापर्यंत गेल्यानंतर, त्या रात्री कधीतरी वाघीण आमच्या छावणीच्या मागील बाजूच्या झुडपी जंगलातून लढ्या नदी ओलांडून गेली. या झुडपांतून एक पायवाट जात होती, जी मनुष्यभक्षक येईपर्यंत लढ्या दरीतील गावकऱ्यांनी नियमित पणे वापरली होती; पण त्यानंतर ती वाट असुरक्षित झाली होती. २८ तारखेला, टणकपूरपर्यंत इबॉटसनची डाक नेण्याच्या पहिल्या टप्प्यावर जाणारे दोन धावते टपालवाहक छावणीत उशीरा आले; वेळ वाचवण्यासाठी त्यांनी—किंवा अधिक अचूक सांगायचे तर, जवळचा मार्ग घेण्याचा प्रयत्न केला—या झुडपांतून जाणारा एक छोटा मार्ग. सुदैवाने पुढे चालणारा माणूस सतर्क होता; झुडपांतून दबकत येणारी वाघीण त्याच्या नजरेस पडली, आणि ती त्यांच्या पुढेच वाटेजवळ आडवी पडली होती.

इबॉटसन आणि मी ठाकहून नुकतेच परत आलो होतो, तेवढ्यात हे दोघे माणसे धावत छावणीत आली; आम्ही लगेच रायफली उचलल्या आणि चौकशीसाठी धाव घेतली. वाटेवर वाघीण बाहेर आली होती त्या ठिकाणी तिच्या पाऊलांच्या खुणा (पगमार्क्स) आम्हाला दिसल्या, आणि तिने थोड्या अंतरापर्यंत

त्या माणसांचा पाठलाग केला होता हेही स्पष्ट होते; पण आम्हाला ती दिसली नाही. मात्र एका ठिकाणी, जिथे झुडपे फारच दाट होती, तिथे काही हालचाल दिसली आणि एखादा प्राणी दूर जात असल्याचा आवाज ऐकू आला.

२९ तारखेच्या सकाळी ठाकहून काही माणसे खाली आली आणि त्यांनी कळवले की त्यांचा एक बैल आदल्या रात्री गोठ्यात परतला नव्हता; शेवटचा जिथे तो दिसला होता तिथे शोध घेतला असता थोडेसे रक्त आढळले होते. दुपारी दोन वाजता इबॉटसन, मी आणि इतर लोक त्या जागी पोचलो; जमिनीकडे एक नजर टाकताच बैलाला वाघाने ठार मारून उचलून नेले आहे याची खात्री झाली. घाईघाईत थोडेसे जेवण उरकून, इबॉटसन आणि मी—मागून मचाणा साठी दोऱ्या घेऊन दोन माणसे येत होती—ओढत नेलेल्या वाटेने पुढे निघालो. ही वाट डोंगराच्या उतारावरून आडवी सुमारे शंभर यार्ड गेली आणि मग थेट त्या दरीत उतरली, जिथे एप्रिलमध्ये मी मोठ्या वाघावर गोळी झाडली होती आणि चुकलो होतो. या दरीत काहीशे यार्ड खाली गेल्यावर, प्रचंड मोठा असलेला तो बैल दोन दगडांच्या मध्ये अडकला होता; हलवता न आल्याने वाघीणीने त्याच्या मागच्या भागावरून एक वेळचे भोजन केले आणि त्याला तिथेच सोडून दिले होते.

ती एवढे वजन ओढत असल्यामुळे वाघीणीच्या पाऊलांच्या खुणा पसरलेल्या होत्या, त्यामुळे ती मनुष्यभक्षक आहे की नाही हे ठरवणे शक्य नव्हते; पण या परिसरातील प्रत्येक वाघीण संशयास्पद असल्याने मी त्या मृतदेहावर बसून वाट पाहण्याचा निर्णय घेतला. मृतदेहाजवळ योग्य अंतरावर एकच झाड होते; माणसे त्यावर मचाण बांधण्यासाठी चढू लागली, तेवढ्यात खाली दरीतून वाघीणीचा आवाज येऊ लागला. घाईघाईत दोन फांद्यांमध्ये दोरीचे काही तुकडे बांधले गेले;

इबॉटसन रायफल घेऊन पहारा देत उभा राहिला, आणि मी झाडावर चढून बसलो—जे पुढील चौदा तासांत मी कधी बसलो होतो त्यातले सर्वांत अस्वस्थ आणि सर्वांत धोकादायक मचाण ठरले. झाड डोंगरापासून दूर झुकलेले होते, आणि ज्या तीन असमतोल दोऱ्यांवर मी बसलो होतो त्याखालून शंभर फूटांहून अधिक खोल, दगडी दरीत कोसळण्याची भीती होती.

मी झाडावर बसत असतानाच वाघीणीने अनेकदा हाक दिली, आणि संध्याकाळपर्यंत मोठ्या अंतराने ती हाक देत राहिली; शेवटची हाक अर्धा मैल दूर असलेल्या कड्यावरून आली. यावरून हे स्पष्ट झाले की वाघीण मृतदेहाजवळच दबा धरून बसली होती आणि माणसे झाडावर चढताना तिने पाहिली होती. पूर्वानुभवावरून याचा अर्थ मला ठाऊक होता: त्रास दिल्याबद्दल तिने आपला रोष व्यक्त केला आणि निघून गेली. प्रत्यक्षात, मी त्या तीन दोऱ्यांवर बसून राहिलो असताना इबॉटसन दुसऱ्या दिवशी सकाळी परत येईपर्यंत, संपूर्ण रात्री मला काहीही दिसले किंवा ऐकू आले नाही.

गिधाडांना हा मृतदेह सापडण्याची शक्यता नव्हती, कारण दरी खोल होती आणि झाडांच्या सावलीत होती; आणि बैल इतका मोठा होता की वाघीणीला त्यावरून अनेक वेळचे भोजन मिळू शकले असते. म्हणून आम्ही ठरवले की जिथे तो आत्ता पडला होता तिथे पुन्हा बसून वाट पाहायची नाही; वाघीण तो अधिक सोयीच्या जागी नेईल, आणि तिथे आपल्याला गोळी झाडण्याची चांगली संधी मिळेल, अशी आशा होती. पण यात आम्हाला निराशा आली, कारण वाघीण पुन्हा कधीच त्या मृतदेहाकडे परतली नाही.

दोन रात्रीनंतर, सेम येथील आमच्या छावणीमागे बांधून ठेवलेला म्हैस ठार मारला गेला; आणि माझ्याकडून थोडेसे दुर्लक्ष झाल्यामुळे मनुष्यभक्षकाला पकडण्याची एक मोठी संधी हुकली.

हा प्रकार सांगायला आलेल्या माणसांनी कळवले की प्राण्याला बांधलेली दोरी तुटलेली होती, आणि मृतदेह ज्या दरीच्या खालच्या टोकाशी तो बांधला होता तिकडे ओढत नेला गेला होता. हीच ती दरी होती जिथे एप्रिलमध्ये मॅकडोनाल्ड आणि मी एका वाघीणीचा पाठलाग केला होता; आणि त्या वेळी तिने आपली शिकार दरीत बराचशी वर नेली होती. त्यामुळे या वेळीही तिने तसेच केले असावे, असा मूर्खपणाचा निष्कर्ष मी काढला.

नाश्त्यानंतर इबॉटसन आणि मी मृतदेह शोधायला आणि संध्याकाळी बसून वाट पाहण्याची कितपत शक्यता आहे ते पाहायला निघालो.

ज्या दरीत म्हैस मारली गेली होती ती सुमारे पन्नास यार्ड रुंद होती आणि ती खोल आतपर्यंत पसरत गेली होती.

ज्या दरीत म्हैस मारली गेली होती ती सुमारे पन्नास यार्ड रुंद होती आणि पायथ्याच्या डोंगरांत खोलवर शिरत जात होती. पहिल्या दोनशे यार्डपर्यंत दरी सरळ होती आणि त्यानंतर ती डावीकडे वळत होती. त्या वळणाच्या थोड्याच पुढे, आणि त्याच्या डाव्या बाजूला, कोवळ्या लहान झाडांची दाट झाडी होती; तिच्या मागे शंभर फूट उंच असा एक कडा होता, ज्यावर दाट गवत वाढलेले होते.

दरीत, आणि त्या लहान झाडांच्या जवळच, पाण्याचे एक छोटेसे डबके होते. एप्रिलमध्ये मी या दरीत अनेकदा गेलो होतो, पण ही झाडी वाघ दबा धरून

बसण्यासाठी योग्य जागा असू शकते हे माझ्या लक्षात आले नव्हते; त्यामुळे वळण घेताना घ्यायला हव्या त्या खबरदाऱ्या मी घेतल्या नाहीत. परिणामी, त्या डबक्यात पाणी पीत असलेल्या वाघीणीने आम्हाला आधी पाहिले. तिच्यासाठी माघार घेण्याचा एकच सुरक्षित मार्ग होता, आणि तिने तोच निवडला—तो म्हणजे थेट उभ्या चढणाऱ्या डोंगरावरून वर, कड्याच्या पलीकडे, आणि पुढील साल जंगलात शिरणे.

डोंगर इतका उभा होता की आम्हाला थेट चढता येईना, म्हणून आम्ही दरीतच पुढे गेलो, जिथे सांबराचा एक वाटाड्या दरी ओलांडत होता; ती वाट धरून आम्ही कड्यावर पोहोचलो. आता वाघीण एका त्रिकोणी जंगलपट्ट्यात होती—एका बाजूला कडा, दुसऱ्या बाजूला लाध्या नदी, आणि तिसऱ्या बाजूला असा कडेलोट की ज्यातून कोणताही प्राणी खाली जाऊ शकत नव्हता. हा परिसर फार मोठा नव्हता, आणि त्यात अनेक हरणे होती; ती वेळोवेळी वाघीणीची स्थिती आम्हाला कळवत होती. पण दुर्दैवाने जमीन अनेक खोल व अरुंद पावसाळी पाण्याच्या नाल्यांनी छिन्नविछिन्न झालेली होती, आणि शेवटी त्यातच आम्ही तिचा माग काढणे गमावले.

आम्हाला अजून मृतदेह दिसला नव्हता, म्हणून आम्ही सांबराच्या वाटेने परत दरीत उतरलो आणि तो मृतदेह त्या लहान झाडांमध्ये लपवलेला आढळला. ही झाडे सहा इंचां पासून एक फूट घेराची होती आणि मचाण धरण्याइतकी मजबूत नव्हती; त्यामुळे मचाण बांधण्याचा विचार सोडून द्यावा लागला. कदाचित सळईच्या साहाय्याने डोंगराच्या उतारातून एखादा दगड उचकटून बसण्याची जागा करता आली असती, पण मनुष्यभक्षकासमोर असे करणे शहाणपणा चे नव्हते.

गोळी झाडण्याची संधी सोडून देणे आम्हाला जड जात होते, म्हणून मृतदेहाजवळच्या गवतात लपून बसण्याचा विचार आम्ही केला—वाघीण अंधार पडण्याआधी परत येईल आणि तिने आम्हाला पाहण्याआधी आम्ही तिला पाहू, अशी आशा होती. पण या योजनेला दोन आक्षेप होते: (अ) गोळी झाडता आली नाही आणि वाघीणीने आम्हाला आपल्या शिकारी जवळ पाहिले, तर जसे तिने आधीच्या दोन शिकारी सोडून दिल्या होत्या तसेच हीही ती सोडून देईल; आणि (ब) मृतदेह आणि छावणी यांच्या मध्ये अत्यंत दाट झुडपी जंगल होते, आणि अंधारात त्यातून जाण्याचा प्रयत्न केला तर आम्ही वाघीणीच्या पूर्ण दयेवर असू. म्हणून फारच अनिच्छेने आम्ही  त्या रात्री मृतदेह वाघीणीसाठीच सोडून देण्याचा निर्णय घेतला, आणि दुसऱ्या दिवशी चांगली आशा ठेवली.

पुढील सकाळी परत आल्यावर आम्हाला आढळले की वाघिणीने मृतदेह उचलून नेला होता. तीनशे यार्डपर्यंत ती दरीच्या तळातूनच गेली होती—दगडावरून दगडावर पाऊल टाकत—आणि कुठेही ओढत नेल्याच्या खुणा नव्हत्या. याच ठिकाणी—जिथून तीनशे यार्डावर तिने मृतदेह उचलला होता—आम्ही पूर्ण गोंधळलो; कारण ओलसर जमिनीवर अनेक पाऊलांच्या खुणा होत्या, पण त्यांपैकी एकही मृतदेह उचललेला असताना उमटलेली नव्हती. अखेर सर्व बाजूंनी शोध घेतल्यानंतर, ती दरी सोडून डाव्या बाजूच्या डोंगरावर चढली आहे हे आम्हाला सापडले.

ज्या डोंगरावरून वाघीण मृतदेह घेऊन गेली होती तो फर्न आणि सोनकाडी (गोल्डन-रॉड) यांनी व्यापलेला होता; त्यामुळे माग काढणे कठीण नव्हते, पण चालणे मात्र नक्कीच कठीण होते, कारण डोंगर फार उभा होता आणि काही ठिकाणी

वळसा घालून पुढे जावे लागले व पुन्हा खुणा पकडाव्या लागल्या. जवळजवळ हजार फूटांचा कडक चढ चढून आम्ही एका छोट्या सपाटीवर आलो; तिच्या डाव्या बाजूला मैलभर रुंद असा कडेलोट होता. कड्यालगतच्या बाजूला जमीन तड्यांनी आणि भेगांनी भरलेली होती, आणि त्या भेगांत दोन ते सहा फूट उंचीची दाट सालची वाढ उगवलेली होती. वाघीणीने आपली शिकार या दाट आडोशात नेली होती, आणि आम्ही प्रत्यक्ष तिच्यावर पाय पडेपर्यंत तिचे ठिकाण आम्हाला कळलेच नाही.

म्हशीचे उरलेसुरले अवशेष पाहण्यासाठी आम्ही थांबलो असतानाच, आमच्या उजव्या बाजूने एक खोल गुरगुर ऐकू आली.

बंदुका उंचावून आम्ही क्षणभर थांबलो; आणि मग ज्या दिशेने तो आवाज आला होता त्यापेक्षा थोडे पुढे झुडपांत हालचाल ऐकू येताच, आम्ही कोवळया सालच्या झाडांतून दहा यार्ड वाट काढत पुढे गेलो आणि एका छोट्याशा मोकळया जागी पोचलो. तिथे वाघीणीने मऊ गवतात आपली विश्रांतीची जागा बनवली होती. त्या गवताच्या पलीकडे डोंगर सुमारे वीस यार्ड वर चढत दुसऱ्या सपाटीपर्यंत जात होता आणि हाच उतार त्या आवाजाचा स्रोत होता. शक्य तितक्या शांतपणे उतार चढत आम्ही नुकतेच त्या सुमारे पन्नास यार्ड रुंद सपाटीवर पोहोचलो, तेवढ्यात वाघीण दुसऱ्या टोका कडून खाली दरीत उतरली; उतरताना तिने काही काळीज, तितर आणि एक काकर यांना घाबरवले. तिचा पाठलाग करणे व्यर्थच होते, म्हणून आम्ही परत मृतदेहाजवळ आलो; त्यावर अजूनही चांगलेसे मांस शिल्लक असल्याने, बसण्या साठी दोन झाडे निवडली आणि छावणीकडे परतलो.

लवकर दुपारचे जेवण करून आम्ही पुन्हा मृतदेहाजवळ गेलो आणि बंदुकांमुळे अडथळा येत असतानाही, कष्टाने निवड लेल्या झाडांवर चढलो. पाच

तास आम्ही तिथे बसून राहिलो, पण काहीही दिसले नाही किंवा ऐकू आले नाही. संध्याकाळी अंधार पडू लागल्यावर आम्ही झाडांवरून खाली उतरलो आणि तुटक-फुटक, असमतल जमिनीवरून ठेचकाळत शेवटी पूर्ण अंधारात दरीत पोहोचलो. आमच्या दोघांनाही कुणीतरी आपला पाठलाग करत आहे अशी अस्वस्थ भावना होती; पण एकमेकांच्या अगदी जवळ राहून आम्ही रात्री नऊ वाजता कोणत्याही प्रसंगाविना छावणीत पोचलो.

आता इबॉटसन दांपत्य सेममध्ये शक्य तितका काळ थांबले होते, आणि दुसऱ्या दिवशी पहाटेच त्यांनी आस्कोट येथील ठरलेल्या भेटीसाठी बारा दिवसांच्या पायी प्रवासाला सुरुवात केली. निघण्यापूर्वी इब्बट्सनने माझ्याकडून एक वचन घेतले—की मी एकट्याने कोणत्याही शिकारीचा पाठपुरावा करणार नाही, आणि सेममध्ये एक-दोन दिवसां पेक्षा जास्त थांबून माझे प्राण अधिक धोक्यात घालणार नाही.

इब्बट्सन आणि त्यांची पन्नास माणसे निघून गेल्यानंतर, दाट झुडपांनी वेढलेली आमची छावणी केवळ माझ्या दोन सेवकांपुरती आणि माझ्यापुरती उरली—माझे कूली मुखियाच्या घरातील एका खोलीत राहत होते. म्हणून दिवसभर मी सर्वांना नदीच्या संगमाजवळ सहज मिळणाऱ्या भरपूर वाहून आलेल्या लाकडाचे ढीग गोळा करण्याच्या कामाला लावले, जेणेकरून रात्रभर मोठी आग पेटती ठेवता येईल. ही आग वाघीणीला घाबरवणार नव्हती, पण ती रात्री आमच्या तंबूभोवती फिरली तर आम्हाला तिला पाहता येईल; शिवाय रात्री थंडी वाढू लागली होती, त्यामुळे रात्रभर मोठी आग ठेवण्यासाठी कारणांची काहीच कमतरता नव्हती.

सायंकाळच्या सुमारास, माझी माणसे सुरक्षितपणे छावणीत परतल्यावर, मी एक बंदूक घेऊन लाध्या नदीवर वरच्या बाजूला गेलो—वाघीणीने नदी ओलांडली आहे का हे पाहण्या साठी. वाळूत मला अनेक पाऊलांच्या खुणा सापडल्या, पण कुठलीही ताजी नव्हती; आणि संध्याकाळी परत येताना मला खात्री वाटली, की वाघीण अजूनही नदीच्या आमच्याच बाजूला आहे. तासाभराने, पूर्ण अंधार पडल्यावर, आमच्या तंबूजवळ एक काकर भुंकू लागला आणि तब्बल अर्धा तास सातत्याने भुंकत राहिला.

आता म्हशी बांधून ठेवण्याचे काम माझ्या माणसांनीच हाती घेतले होते—आधीपर्यंत हे काम इबॉटसनची माणसे करत होती. दुसऱ्या सकाळी म्हशी आणायला ते परत गेले, तेव्हा मी त्यांच्यासोबत गेलो. आम्ही कित्येक मैल फिरलो, तरी मला वाघिणीचा कोणताही माग सापडला नाही. नाश्त्या नंतर मी मासेमारीची काठी घेऊन संगमाकडे गेलो आणि माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम मासेमारीपैकी एक अनुभवला. संगम मोठ्या माशांनी भरलेला होता, आणि हलक्या साहित्यात वारंवार तुटफूट होत असली तरी, छावणीला पुरेल इतके महाशीर मासे मी पकडले.

मागील संध्याकाळप्रमाणेच पुन्हा एकदा, लाध्या नदी ओलांडून, नदीच्या उजव्या काठावरील मोकळया जमिनीवर नजर ठेवणाऱ्या एका दगडावर जाऊन बसण्याचा माझा विचार होता—वाघीण नदी ओलांडताना दिसते का हे पाहण्यासाठी. संगमाजवळील पाण्याच्या गडगडाटापासून दूर जाताच, माझ्या डाव्या बाजूच्या डोंगरावर एक सांबर आणि एक माकड ओरडताना ऐकू आले; आणि त्या गडाजवळ पोचताच, मला वाघीणीच्या ताज्या पाऊल खुणा दिसू लागल्या.

त्या मागे जात मी पाहिले, तर जिथे तिने नदी ओलांडली होती तिथले दगड अजूनही ओले होते. छावणीत मासेमारी ची दोरी वाळवायला आणि एक कप चहा प्यायला घेतलेला काही मिनिटांचा उशीर एका माणसाच्या जीवावर बेतला, हजारो लोकांना अनेक आठवडे चिंता भोगावी लागली, आणि मलाही अनेक दिवस ताण सहन करावा लागला; कारण सेममध्ये आणखी तीन दिवस थांबलो तरी मला वाघीणीवर गोळी झाडण्याची आणखी एकही संधी मिळाली नाही.

७ तारखेला सकाळी, मी छावणी आवरत होतो आणि टणकपूरपर्यंतच्या वीस मैलांच्या पायी प्रवासाची तयारी करत असताना, आसपासच्या सर्व गावांमधून मोठा जमाव आला आणि त्यांनी मला मनुष्यभक्षकाच्या क्रूर दयेवर त्यांना सोडून जाऊ नये अशी विनवणी केली. त्यांच्या परिस्थितीत शक्य तेवढा सल्ला देऊन, मला शक्य होताच परत येईन असे वचन मी त्यांना दिले.

दुसऱ्या सकाळी टणकपूरला मी गाडी पकडली आणि ९ नोव्हेंबरला नैनितालला परतलो—जवळजवळ महिनाभर दूर होतो.

## भाग तीन

७ नोव्हेंबरला मी सेम सोडले, आणि १२ तारखेला वाघीणीने ठाक येथे एका माणसाला ठार केले. हलद्वानी येथील विभागीय वनाधिकाऱ्यांकडून या हत्येची बातमी मला टेकड्यांच्या पायथ्याशी असलेल्या आमच्या हिवाळी घरात उतरल्यानंतर लवकरच मिळाली; आणि जोरदार चाल करत मी २४ तारखेला सूर्योदयानंतर थोड्याच वेळात चुका येथे पोचलो.

माझा विचार चुकामध्ये नाश्ता करून मग ठाकला जाऊन तिथेच तळ ठोकण्याचा होता; पण ठाकचा मुखिया, जो मला चुकामध्येच भेटला, त्याने सांगितले की १२ तारखेला खून झाल्यानंतर लगेचच ठाकमधील प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मूल गाव सोडून गेले आहे. तो पुढे म्हणाला की मी ठाकला छावणी केली तर कदाचित माझा जीव सुरक्षित राहील, पण माझ्या माणसांचे प्राण सुरक्षित ठेवणे शक्य होणार नाही. हे पूर्णपणे रास्त होते. माझी माणसे येईपर्यंत थांबत असताना, मुखियाने मला चुकामध्ये छावणीसाठी अशी जागा निवडून दिली जिथे माझी माणसे बऱ्यापैकी सुरक्षित राहतील आणि जंगलतोडीसाठी जमलेल्या हजारो लोकांपासून मला थोडाफार एकांतत मिळेल.

विभागीय वनाधिकाऱ्यांचा तार मिळताच मी टणकपूरच्या तहसीलदाराला तार करून तीन तरुण नर म्हशी चुकाला पाठवण्यास सांगितले होते. माझ्या विनंतीला तात्काळ प्रतिसाद मिळाला होता, आणि त्या तिन्ही म्हशी आदल्या संध्याकाळीच पोचल्या होत्या.

नाश्त्यानंतर मी एक म्हैस घेऊन ठाककडे निघालो; १२ तारखेला जिथे माणूस मारला गेला होता, तिथे ती बांधण्याचा माझा हेतू होता. त्या दिवसाच्या घटनांचे मुखियाने मला अत्यंत जिवंत वर्णन केले, कारण तो स्वतःही जवळजवळ वाघीणीचा बळी ठरला असता. असे दिसते की दुपारच्या सुमारास, दहा वर्षांची नात घेऊन, तो आपल्या घरापासून सुमारे साठ यार्ड अंतरावर असलेल्या शेतात आल्याच्या कंदांची खणाखणी करायला गेला होता. हे शेत सुमारे अर्धा एकराचे असून तीन बाजूंनी

जंगलाने वेढलेले आहे; आणि ते बऱ्यापैकी तीव्र उतारावर असल्याने मुखियाच्या घरातून स्पष्ट दिसते.

वृद्ध माणूस आणि त्याची नात काही काळ काम करत असताना, घराच्या अंगणात भात सडत असलेली त्याची पत्नी अत्यंत अस्वस्थ आवाजात ओरडली आणि त्याला विचारले की जंगलात वरच्या बाजूला किलबिल करणारे तितर आणि इतर पक्षी ऐकू येत नाहीत, इतका तो बहिरा झाला आहे काय. सुदैवाने त्याने क्षणाचाही विलंब न करता कृती केली. हातातील कोयता टाकून, त्याने मुलीचा हात झटकन पकडला. शेताच्या वरच्या टोकाला असलेल्या झुडपांत लाल रंगाचा प्राणी दिसत असल्याचे पत्नीने सांगताच तिच्या ओरडण्याने दोघेही धावत घराकडे परतले. अर्ध्या तासानंतर मुखियाच्या घरापासून सुमारे तीनशे यार्ड अंतरावर असलेल्या शेतात झाडाच्या फांद्या छाटत असलेल्या एका माणसाला वाघिणीने ठार केले.

मुखियाने दिलेल्या वर्णनावरून त्या झाडाचा शोध घेण्यात मला काहीच अडचण आली नाही. ते दोन पायऱ्यांच्या शेतांच्या मध्ये असलेल्या सुमारे तीन फूट उंच कड्यावर उगवलेले, वाकडे-तिकडे वाढलेले छोटे झाड होते; गुरांसाठी चारा मिळावा म्हणून ते दरवर्षी छाटले जात असे. जो माणूस मारला गेला होता, तो खोडावर उभा राहून एका हाताने एक फांदी धरून दुसरी कापत होता, तेवढ्यात मागून वाघीण आली, त्याची पकड झटकून टाकली आणि त्याला ठार मारल्यानंतर शेतांच्या कडेच्या दाट झुडपात त्याला उचलून नेले.

ठाक हे गाव गुरखा अधिपत्यापूर्वी अनेक शतके कुमाऊँवर राज्य करणाऱ्या चंद राजांनी, पूर्णागिरी मंदिरांतील सेवांच्या मोबदल्यात, सध्याच्या मालकांच्या पूर्वजांना दिलेली देणगी होते. (ठाक व आणखी दोन गावांची जमीन कायमस्वरूपी

करमुक्त राहील, अशी चंद राजांनी दिलेली हमी ब्रिटिश सरकारने शंभर वर्षे पाळली आहे.) सुरुवातीला गवताच्या झोपड्यांचा समूह असलेले हे गाव कालांतराने भरभराटीची वसाहत बनले; दगडी बांधकामांची, स्लेटच्या कौलांनी छप्पर घातलेली घरे येथे उभी राहिली, कारण जमीन अत्यंत सुपीक आहेच, शिवाय मंदिरांकडून मिळणारे उत्पन्नही मोठे आहे.

कुमाऊँमधील इतर सर्व गावांप्रमाणेच, शेकडो वर्षांच्या अस्तित्वात ठाकने अनेक चढउतार पाहिले आहेत; पण आपल्या दीर्घ इतिहासात प्रथमच ते असे ओस पडले होते. माझ्या मागील भेटींमध्ये ते मला उद्योगाने गजबजलेले मधमाश्यांच्या पोळ्यासारखे वाटले होते; पण त्या दुपारी, तरुण म्हैस सोबत घेऊन मी तेथे गेलो, तेव्हा पूर्ण शांतता पसरलेली होती. शंभराहून अधिक रहिवासी, आपली जनावरेही घेऊन, सारेच पळून गेले होते—गावात मला दिसलेला एकमेव प्राणी म्हणजे एक मांजर; त्यानेच माझे आपुलकीने स्वागत केले. एवढ्या घाईघाईने गाव रिकामे करण्यात आले होते की अनेक घरांची दारे उघडीच राहिली होती. गावातील प्रत्येक वाटेवर, घरांच्या अंगणात आणि प्रत्येक दारासमोरच्या धुळीत मला वाघीणीचे पाऊलांचे ठसे दिसत होते. उघडी दारे धोकादायक होती, कारण गावातून जाणारी वाट त्यांच्या अगदी जवळून वळण घेत जात होती, आणि कोणत्याही घरात वाघीण दबा धरून बसलेली असण्या ची शक्यता होती.

गावाच्या वरच्या बाजूस, सुमारे तीस यार्ड उंच टेकडीवर, गुरांचे अनेक गोठे होते; आणि त्या आसपास मला कधीही न पाहिल्याइतके काळीज, तितर, लाल जंगली कोंबडे आणि पांढऱ्या टोपीचे बॅब्लर दिसले. त्यांनी मला अगदी निर्धास्त पणे

त्यांच्यामध्ये फिरू दिले, यावरून ठाकच्या लोकांना प्राणीहत्येबाबत धार्मिक आक्षेप आहे, हे स्पष्ट होते.

गुरांच्या गोठ्यांच्या वरच्या पायऱ्यांच्या शेतांतून गावाचे विहंगम दृश्य दिसते; आणि मुखियाने दिलेल्या वर्णनावरून वाघीणीने शेवटचा बळी जिथे पकडला त्या झाडाचा ठाव घेणे अवघड नव्हते. झाडाखालील मऊ मातीमध्ये झटापटी च्या खुणा आणि वाळलेल्या रक्ताचे काही गोळे दिसत होते. येथून वाघिणीने आपली शिकार सुमारे शंभर यार्ड अंतरावर नांगरलेल्या शेतातून, एक दाट कुंपण ओलांडून, पलीकडील दाट झुडपात ओढत नेली होती. गावाकडून त्या ठिकाणी आणि परत जाणाऱ्या पाऊलांच्या खुणांवरून संपूर्ण गावकरी हत्यास्थळी आले होते हे दिसत होते; पण झाडापासून कुंपणापर्यंत मात्र फक्त एकच पायवाट होती—वाघीणीने आपल्या बळीला उचलून नेताना उमटवलेली. तिचा पाठलाग करून मृतदेह परत मिळवण्याचा कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नव्हता.

झाडाखालील थोडी माती खरडून काढताच मी एक मूळ उघडे केले आणि त्या मुळाला माझी म्हैस बांधली. जवळच्या कडब्याच्या ढिगाऱ्यातून आणलेल्या भरपूर पेंढ्याने तिचे अंगण नीट पसरून दिले.

